काव्य
१९३८



# ... खाची ठेव

REFBK-0018301
REFBK-0018301

— सौ. सुशिला मराठे

५३५९४
२।३।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५३५९४ दि: २५।२।७१
क्रमांक १९३९ नों: दि: २।३।७१

# 'मम सुखाची ठेव'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 19301
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0018301
REFBK-0018301

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

सौ. सुशीला मराठे

प्रकाशिका :
**सौ. सुशीला मराठे**
पद्मिनी प्रकाशन

मुद्रक :
**चिंतामण वामन जोशी**
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग, जि. कुलाबा.

**मूल्य साडे तीन रुपये**

पत्ता :
६ बी–श्रीपंत भुवन
सरदार पटेल रोड, मुंबई ७.

# अर्पण-पत्रिका

बालगंधर्वांचे वेड असे आजही जयांना
ज्यांनीं नव्हते पाहिले 'बालगंधर्वा' तयांना
ज्या ज्या रसिकांनीं त्यांच्यावरी ओवाळीला जीव
त्यांना आदरें अर्पण 'मम सुखाची ही ठेव'

या 'ठेवी' चें मूल्यमापन कै. आचार्य अत्रे करणार होते; पण ईश्वरेच्छा निराळी होती. त्यांना मूक श्रद्धांजलि वाहून वरील कोऱ्या जागेंत त्यांनीं काय म्हटलें असतें तें आम्हांला मुक्ताबाईच्या दृष्टीनें वाचतां येतं, तर फार बरं झालं असतं !

## ‘ ठेव ’ उघडण्यापूर्वी....

मध्यम वर्गांतील माझ्यासारख्या एका स्त्रीनें या महागाईच्या दिवसांत, काव्याचं पुस्तक कोणी फारसं विकत घेऊन वाचीत नाहीं, अशा परिस्थितींत ही पुस्तक-छपाई-प्रकाशनाची उठाठेव करायची म्हणजे एक धाडसच! पण लहानपणापासून बाल-गंधर्वांच्या गानाभिनयाची मोहिनी कानीं-मनीं-लोचनीं-वाचनीं सांठलेली ठेवच होती. ती स्वस्थ बसूं देईना. म्हणून तर त्यांचं कलात्मक जीवन दुसऱ्याला सांगण्याची हौस आणि तितकाच हव्यास. आणि म्हणूनच हा सारा प्रपंच !

या कामीं मला कितीतरी मदतीचे हात लाभले. सुप्रसिद्ध चित्र-कार श्री. गोलिवडेकर व त्यांच्या पत्नी सौ. कमलताई, सौ. निर्मला बापट, श्री. ह. सी. उर्सेकर, श्री. वि. ज. घारपुरे, श्री. गोपाळराव मेहेंदळे, श्री. शंकर वैद्य, श्री. माधव खरे, सौ. मालतीबाई डहाणूकर, गंधर्वभक्त श्री. अनंतराव लिमये, श्री. ग. का. रायकर या व माझ्या इतर कांहीं हितचिंतकांनीं मला आस्थेनें, कौतुकानें, निरपेक्ष बुद्धीनें हरत-हेचें साहाय्य करून उपकृत करून ही ‘ मम सुखाची ठेव ’ रसिकांपुढें मोकळी करण्यास उत्तेजन दिलें. औपचारिकपणें आभार मानावेत अशी ही कोणी नाहींत.

अलिबागच्या माधव प्रिंटिंग प्रेसचे संचालक श्री. चिंतामण जोशी व मुद्रणालयाचे सेवकवर्ग यांनीं अवघ्या सात-आठ दिवसांत पुस्तकाचे काम सुबक रीतीनें पुरे करून दिलें याबद्दल त्यांनाही धन्यवाद !

— सौ. सुशीला मराठे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 9(307)

# ‘गगन नटवरा, विस्मयकरा’

(मिश्रवृत्त)

निरखित सायंतनीं बैसले जलाशयाच्या कांठीं
कृष्णमेघ तों गगनीं करिती बघता बघता दाटी
जलकण आले मुदित मनानें होउनि कृतकृत्य
सुरू जाहलें भूवरि अवचित जलधारा-नृत्य

जमीन-अस्मानाचें नातें जडलें—मनिं वाटलें—
‘ सुतावरूनि या चढुनि पहावें स्वर्गिं काय चाललें ?’
आजवरी जे गेले तेथें—टिळक, गांधी, नेहरू,
गायक, लेखक, वक्ते, नेते, नट—त्यां वंदन करूं

किरण रम्य सोनेरी आले त्यांत पश्चिमेकडुनि
नकळत अनुपम शोभा येई इन्द्रधनूची खुलुनि
—इंद्रनील—जांभळे—निळेसे,—लाल—केशरी—हिरवे
पिवळे—धूसर, लव लवलेले, कमानींत जे मिरवे

शीतल वायू येई, लावी सुरेल षड्ज प्रशांत
इंद्रधनूतिल सात रंग तों झाले सुस्वर सात
हळूं लागले धनू जरासें, रंग जाहले फिके
रंगित वातावरणीं झालें स्वर हळुंहळुं बोलके—

—आला येथें अलिकडेच कुणि सुंदर गंधर्व
सुरू जाहलें संगीताचे, नाट्याचें पर्व
रंजवि देवादिकां म्हणतसे त्यांना ‘ हे देवा—
मायबाप हो, अन्नदाते आतां माझे व्हा !’

नर, नारायण, किंवा आहे शापभ्रष्ट देवता ?
स्वरुपसुंदर राजसराणा कुशलचि अभिनेता ?

नारिरुप पाहूनि तयाचे नतमस्तक अप्सरा
इन्द्रपुरीचे देवहि करिती ‘ नमन ’ अशा ‘ नटवरा ’
धवल यशाच्या ‘ हंसा ’ पुढती नमला ऐरावत
मधुर गळ्याची गोडी चाखुनि लाजलेच अमृत
प्राजक्ताची कोमलता तर विरूनिया गेली
ऐकुनिया स्वरमाला कोमल त्याच्या कंठांतली

सरस्वतीचा मोर नाचतो श्रवणीं स्वर-धारा
स्वर-प्रवीणा पाहुनि वीणा सहर्ष करि झंकारा
दाद देति गंधर्व-यक्ष-सुर-किन्नर या गायका
स्वर-वलयांतिल विलास पाहुनि डोलविती मस्तका
तेजस्वी कां शुक्र उगवला गगनीं हाच दुजा ?
राज्य करितसे लावुनि येथें संगीताची ध्वजा
ऐकियलें कीं “ ‘ राजहंस ’ हा स्वर-सरिं पोहतसे
असंख्य जनमानसा तयाचें जडलें होतें पिसें
वसुंधरा जणुं तानपुरा, कीं तारा जुळल्या स्वर्गीं
स्वरांवरूनि अति-तार-सप्तकीं ये देण्या वानगी
महाराष्ट्राला वेड तयाचे, दैवत कितिकांचें
भूषण होतें रंगभूमिचें, शिल्पचि कनकाचें ”
प्रसन्न झाले सुरवर, त्याला पुसती ‘ काय हवें ? ’
‘ रंगमंच द्या, साथिदार मज नवीन पडदे, दिवे
मयासुराला आज्ञा द्या कीं प्रेक्षागृह बांधी
लाव पणाला किमया सारी कला, युक्ति, बुद्धी
करून दाविन प्रयोग देवा, जसे तिथें गाजले
‘ कंठबले मोहवीन ’ करुनी मनरंजन आपुलें ”

असा कोण हा ? सांगा आम्हा पुरती ना माहिती
पृथ्वीवरती अमाप झाली कैशी हो कीर्ती–”

– “ कोण म्हणुनि कां पुसतां ?–होते देवाचे देणें
सुरेल सुंदर भाग्य आमुचें हरलें हरहर ! त्यानें

कां देवानें ' कुटिल करावी ऐशी चतुराई ?'
गुणवतांना नेण्याची कां त्यास सदा घाई ?

हवाहवासा अजून होता गुणदोषांसहित
ऋणी तयाचे आम्ही, वदणें, तें शब्दातीत
नाट्य-चित्र-संगीत-काव्य अन् शिल्प स्वाभाविक
ललितकलांचे निधान तो, हो शतकांतुनि एक

' लाल लपविला ' रंगभूमिचा ' गगनमणी ' केला
' आवरूनिया दया, अम्हांवर प्रभु ऐसा कोपला '
नेऊनि त्याला मज गमतें कीं प्रभुजी संतोषला
भुलून त्याच्या रूपवैभवा, पाहुनि नाट्य-कला

सदैव होता शांत, सरळ अन् सात्विक वृत्तीचा
वर्णन करण्या सम्राटाचें अपुरी पडते वाचा.

( भूपतिवैभव )

त्या नटसम्राटा त्रिवार करुनी मुजरा
उलगडुनिं दाविते जीवन–जरिपट सारा
परि त्यांत कलात्मक विशेष जें जें होतें
मी आनंदानें कथिनचि अभिमानें तें

ऐकूनि समग्रहि गंधर्वाची गाथा
गुणवंतापुढती विनम्र होईल माथा
हृदयांत मोद हो सांठवाल मग मोठा
नयनांत नीर, सद्गदता येइल कंठा

सर्वंकष वर्णन करण्या गंधर्वाचें
सामर्थ्य हवें तरि कविकुलगुरु-प्रतिभेचे
तो मूर्तिमंत इतिहास रंगभूमीचा
गवई न, परि तो मेरू गानकलेचा

तो अनभिषिक्त सम्राट रंगभूमीचा
रसिकांची हृदयें जिंकुनि घेई साचा

‘ मधुमधुरा–मोहन–गिरा ’ गान स्वर्गीय
अभिनयपटुता, अन् अलौकिक लावण्य
चतुरंग जणूं ही सेना बादशहाची
साम्राज्य कलेचें, भीति न परचक्राची.

(साकी)

महाराष्ट्राच्या संस्कृतिचा इतिहास घडविती ज्या व्यक्ती
त्या माजी या गुणवंताचे नांव झळकतें,–दे स्फूर्ती
नाट्यगान वैभवास चढले घराघरांतिल मनीं–मुखीं
वृद्ध, तरुण अन् स्त्रिया पदें ती गुणगुणती सारखीं
रंगदेवता-किरिट-कोंदणीं तो तेजस्वी हिरा
कर्णसंपुटीं अजून अमुच्या अमृत-रस-धारा
अभिनय-लाघव पाहुनि सहजीं मूक होतसे गिरा
नटसम्राटा महाराष्ट्र दे मानाचा मुजरा
मूर्तिमंत संगीतदेवता, रंगदेवता रती
अनेक रूपें घेउनि जणुं ती अवतरली होती
नाट्यकलेची अखंड केली उपासना त्यानें
प्रसाद देऊनि उदंड रसिकां, केली तृप्त मनें
अभंग-गायनिं रंगुनि जाई भक्त शोभला खरा
टाळ-मृदुंगाच्या तालावर उभवी पंढरपुरा
देवानें अवतार घेतले फक्त दहा भूवरी
साकार करी किती रूपें हा हो रंगमंचकावरि

(छंद : जीहनलहरी)

चालता-बोलता-गाता-इतिहास
पन्नास वर्षांचा रंगभूचा खास
देवानें निर्मिलें महान तें गूढ
उगाच अखेरी उगवला सूड
कारण काय तें मुळींच कळेना
अखेरीला दिल्या कशाला वेदना

‘ बालगंधर्व ’ हे नांव ना व्यक्तीचे
उपमान घेई रूपचि तयाचे
उपमेचें त्याला काय प्रयोजन ?
‘ त्यासमचि तोच, पुढें होणार न ’
सहज–सुरेल–स्वर्गीय–सुंदर
—लयबद्ध असा गायनप्रकार

स्वर्गीय रंगानों, सांगा तुम्ही परी
तेथेही ‘ सुजन कैसा मन चोरी ? ’
अजून मनांत धुंदी संगीताची
सुगंधी रंगीत नाट्यवैभवाची

रूपसौंदर्याची गानमोहिनीची
नशा चढलेली कमी न होण्याची
अशी स्थिती आहे मागील पिढीची
अलौकिक आहे ओढ त्या वेडाची

शापित गंधर्व स्वर्गीचा ये इथें
शाप ?–वरदान ठरलें–गमतें
अपूर्व रंगानें आधीच रंगला
कठांत शर्करा घालून घाडिला

‘ राजहंसा ’ नें या मोतीं निवडिले
नीरस सारून सरस दाविले

(छंद : जीवनलहरी)

श्रीखंडपुरीचे सुग्रास भोजन
मग वामकुक्षी दुपारी घेऊन
‘ लोकमान्यां ’ चें तें सांजेला व्याख्यान
गंधर्व-नाटक रात्रीला पाहून
अति आनंदाचा मानिती तो दिन
पुण्यपत्तनीचे त्यावेळीचे जन

(मिश्रवृत्त)

बोलायाचा-सांगायाचा विषय न गंधर्व
पहावयाचे ऐकायाचे नेत्र भरुनि वैभव
परी सांगते, राहवते ना काय करुं त्याला ?
मनांत भरला विषय येतसे शब्दरूप त्याला

(छंद : देवीवर)

'बालगंधर्व' म्हणजे तद्रूपता ! तल्लीनता !
'बालगंधर्व' म्हणजे स्त्री जातीची शालीनता !
'बालगंधर्व' म्हणजे सात्त्विकता नि आर्जव !
'बालगंधर्व' म्हणजे नाट्य-संगीत वैभव !
'बालगंधर्व' म्हणजे नाट्य-कलेची अस्मिता !
लाखमोलाचा—छे ! नाही—अनमोल अभिनेता !
'बालगंधर्व' म्हणजे अपूर्वसा चमत्कार !
दिव्य स्वर-लय-नाट्य-अभिनय साक्षात्कार !!

## ‘ऐसे जन्मा भाग्य उदेले’

( मिश्रवृत्त )

पुष्पासंगे सुवास लागे मातीलाही ’–वदति कवी
चिंतामणि-स्पर्शानें येई पाषाणा टवटवी
दिनांक साधा विश्रुत होई थोर व्यक्तिच्या जन्मानें
ज्येष्ठ वद्य तृतियेस लाभले भाग्य तसें कौतुकानें
रंगभूमिचें भाग्य उदेलें ‘नारायण’ घे अवतार
रूप-संपदा-स्वर-लय-संगम-भूवरि होई साकार
जगांत संगम कधी न होई सर्व सद्गुणांचा
कुठें कांहिसें न्यून राहते नियमचि जगताचा
चंद्राला क्षय, जरा रमणिला, दात्याला धनलोभ असे,
दरिद्रता विद्वाना, कांटे गुलाब पुष्पा, जगतिं तसे
अपुरेपण हें शल्य बोंचतें ऐकुनिया जन हृदयाला
अपूर्व परि अपवाद एक ह्या ‘ नारायण ’ रूपें दिसला
रंग-रूप-आवाज गोड स्वर-लय, अभिनय भावार्थ तसा
त्याच्या ठायीं एकवटुनिया आदर्शचि हो सुंदरसा

(छंद : जीवनलहरी)

सूर्य नारायण अस्तास जाताना
सांगतसे लोकां “ दैवी क्षण माना
‘ गान-नारायण ’ जन्मा आत्तां आला
देईल विसावा दुःखित मनाला ”

बाळाचा जन्म या भूवरी जाहला
सुगंधी संगीत ‘ मोगरा फुलला ’
स्वर-अलंकार अंगीं बाळ-लेणें
अंगडें-टोपडें सौजन्य-वसनें

रडणें सुरांत हलणें लयींत
पायांतले वाळे वाजती तालांत
पाळण्यांत पाय दिसले बाळाचे
प्रसन्न जाहलें मन माउलीचें

ऐकतां ऐकतां अंगाई गीताला
मनांत सांठवी गोड स्वर-माला
बाबांची सतार कानीं ऐकू येई
तीर्थरुपांचा तो वारसा, पुण्याई

खडीसाखरेचे लाडे लाडे बोल
भासे पदन्यास पहिलें पाऊल
गोजिरा साजिरा जन्मा येई बाळ
रंगभूचे जणुं उजळलें भाळ

फल-ज्योतीषांनी मांडली कुंडली
पाहूनिया खूष शुभ ग्रहावली
एक फलादेश सांगतो सकलां
'धन-लाभ, यश अतीव हो त्याला

मिळवील, परी घालवील सारे ?
असेही सांगती फल सांगणारे
त्यांतलाच एक संगीतज्ञ कुणी
म्हणे 'होईल हा निष्णात गायनीं

सुरेल गंधार कंठांत लागेल
राजयोगी असा युवक होईल !'

(मिश्रवृत्त)

दशवर्षाचा हो 'नारायण' किशोर कवळा सुंदरसा
दैवे त्याला संधि लाभली योग जुळुनि ये साजेसा
संगीताची जाण मिळाली होती वडिलांपासोनी
नाट्याचें त्या वेड उपजतां, गात असे मंजुळ गाणीं

विद्याभ्यासीं मनहि रमेना, कर्तव्याचि जें सानपणीं
पितृभगिनिनें उत्तेजन त्या दिलें व्हावया रसिकमणि
स्वर-सुंदर, आवाज गोड तो ऐकुनि त्याच्या चुलत्यांनी
' लोकमान्य टिळकां ' पुढतीं त्या नेलें सहजहि एक दिनीं

गायन ऐकुनि त्याचे, वदले ' लोकमान्य ' ते त्याच क्षणीं
" बाल असुनि हा दिसतो आहे सुंदरसा ' गंधर्व ' कुणीं !"
नांव तयाचें तेंच जाहलें पुढल्या आयुष्यांत सदा
पुन्हां त्यातुनी एक पर्वणी आली शुभदायीच तदा—

—श्वान चावलें-नेलें त्याला कोल्हापुरिं उपचाराला
' अंबाबाई ' प्रसन्न झाली, हर्ष जाहला राजाला
छत्रपती शाहूराजांनी पाठविलें त्या मिरजेला
' सुंदर गायक आहे—' त्यातें पत्र दिलें त्या समयाला

पत्र पाहुनी, रूप देखुनी ' किर्लोस्कर ' झाले खूष
गाणें ऐकुनि त्याचे म्हणती, ' सुस्वर याचे तर दास ! '
' किर्लोस्कर मंडळींत ' गेला तिथेंच राही आनंदे
रमूं लागला नाट्याभिनयीं, कलागुणांतहि तेथ मुदें
जुन्या नटाची जागा कोणी घेणारा तैसा न मिळे
परी पाहतां ' नारायण ' हा—मनांत कांहींसे आले—

' भाऊची ' जागा घेण्याला योग्य असे हा मनिं वदले
नाटक मंडाळि, नारायण अन्-दोघांचेही दैव खुले !
' शाकुंतल ' नाटकांत दिधली प्रथम भूमिका करावया
उपकारक ती संधी ठरली, घडली अपूर्वशी किमया

' शकुंतले ' नें वेड लाविलें रसिकां सुंदर रूपानें
साधी भोळी ऋषिकन्या ती फुलवी रसिकांची सु-मनें
हवेंहवें जें वाटत होतें सान मुलाला त्यावेळीं
अनायसें तें लाभे, त्याची मानसकलिका तैं खुलली
" पैलू पडले नाहिंत ज्याला असा हिरा हा भासतसे
शिक्षण देतां चमक तयाची दिसेल उठुनी वाटतसे—"

–मालक- लेखक दिग्दर्शक ते पाहुनिया झाले खूष !!
शिक्षक ' देवल ' म्हणती ' हो, हो ' पाहुनि त्याचा आवेश

पैलू पडता चमक लागली खरोखरी शोभायाला
रमूं लागला रंगभूवरी पाय नकळता रोवियला.

(दिंडी)

लावियेलें जणुं रोप अभिनयाचे
घालुनीया खत नाट्यशिक्षणाचे

पर्ण-पुष्पें संगीत तया आलीं
रसिक-हृदयें मोदांत तदा न्हाली.
चंद्रलेखेसम कला वाढुं लागे
गीत गाताना जीवभाव रंगे

नाद लागे त्या सहज, समज आली
कष्ट करिता रेखिले भाग्य भाळीं
' पांचवीला कां पूजियली ' वीणा
देवि सटवाई दे ' प्रसाद ' गाना

दिसामासीं यश-लाभ त्यास झाला
कळस अजुनी ना चढे मंदिराला

(दिंडी)

खूष ' कृष्णाजी ' पाहुनि तयाला
मनीं म्हणती ' स्वातंत्र्य हवें याला '
खास त्याच्यासाठींच रचियलेलें
नवें नाटक ' मानापमान ' आलें

भामिनीची भूमिका मान्य झाली
घे प्रवेशाला कडाडून टाळी
रूपगर्वित – उद्धता मानिनी ती
तशी अल्लड, मा:निते प्रेम-नीती

छटा साऱ्या दाविल्या या नटानें
रसिक तोषविले धुंद गायनानें
दैव अनुकुलता, कष्ट परि करी तो
गौरवाचे गुणगान करी जो तो

(पृथ्वी)

सुकीर्ति-सुमगंध तो पसरला चहूं बाजुला
तदा रसिक-भृंगवृंद रस चाखण्या धांवला
खुडून सुम नेमके बसविले नव्या नंदनीं
स्वतंत्र नव वृत्तीनें सुमन शोभले चंदनीं
हिऱ्यास अति तेज ये गवसता नवें कोंदण
नवीन नटसंच भोंवति तयासवें रंगुन
अलोट करि कष्ट संतत, करी मनोरंजन
नवी तशीच ‘ शारदादि ’ नित नाटकें लावुन

(आर्या)

‘ स्त्री-भूमिका कराव्या ‘ नारायणराव राजहंसा ’नी
लकबी, मुरके, चालहि हंसगती, लाजणें मृदु जनानी
त्यांनाच तेंच शोभे, त्यांच्यासाठींच नाटकें असती ”
म्हणती सारें ऐसे, अभिमानें रसिक हेच वदताती

# ... संभार

| | |
|---|---|
| १) गंधर्व नाटक मंडळी | ‘ इथेंचि थारा पराक्रमाला ’ |
| २) संगीत शाकुंतल | ‘ अरे, वेड्या मना तळमळसी ’ |
| ३) ,, सौभद्र | ‘ वद जाऊं कुणाला शरण ? ’ |
| ४) ,, शारदा | ‘ कधि करिती लग्न माझे ?’ |
| ५) ,, मृच्छकटिक | ‘ रमवाया जाऊं प्रियासी ’ |
| ६) ,, मानापमान | ‘ खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनीं ’ |
| ७) ,, विद्याहरण | ‘ लग्न होईना नाथा तात साहिना ’ |
| ८) ,, स्वयंवर | ‘ स्वकुल तारक सुता ’ |
| ९) ,, संशयकल्लोळ | ‘ संशय कां मनिं आला ’ |
| १०) ,, एकच प्याला | ‘ असे पति देवचि ललनांना ’ |
| ११) ,, द्रौपदी | ‘ ठरला जणुं मत्सर राजा ’ |
| १२) ,, मेनका | ‘ भक्तिभाव हा घ्या सेवा ’ |
| १३) ,, कान्होपात्रा | ‘ विठ्ठल नमिला पंढरपुरांत ’ |
| १४) ,, सावित्री | ‘ एकवटत जीव जिवा, मरणावरि डाव नवा ’ |
| १५) ,, अमृतसिद्धी | ‘ तुम बिन मेरी कोन खबर ले ’ |
| १६) चित्रपट प्रवेश | |

‘ इथेंचि थारा पराक्रमाला ’ ( म्हणुनि ‘ देवा ’ जन्म आला )

**–गंधर्व नाटक मंडळी**

(मिश्रवृत्त)

स्थापन करूनी संस्था ऐशी चालवि अभिमानें
गुणी नटगणा मिळवुनि राही खेळीमेळीनें
रंगमंच सजवुनी सुधारूनि वैभव वाढविलें
किती नाटकें–किती प्रयोगहि संतत ते चालले

वसंतसेना, कधी रेवती, कधि सिंधू, भामिनी
सावित्री, कधि कान्होपात्रा, कधी होइ रुक्मिणी
कधी मेनका, कधी सुभद्रा, कधि मीराराणी
कधी द्रौपदी, कधी शारदा, शकुंतला रमणी

कधी लकेरी, वैजयंति कधि, कधी देवयानी
राधा हो कधि, कधी मंथरा, कधि हो सरोजिनो
कधी नंदिनी, वृन्दा कधि हो, कधी नटी, शालिनी
कधी धैर्यधर, कोदंड, कधी चारूदत्त सुगुणी

भूमिकांत या संतिणि, कोणी राजसुता, गणिका
प्रत्येकीचा स्वभाव, ठेवण, वेष, देश ठाउका
हुबेहुब वठतसे भूमिका ती ती त्यावेळीं
एकरूप होऊन दाखवी, रूपें जरि वेगळीं

जधी रूप घेऊनि बनतसे नायिका कुणीही
विसरूनि जाई भंवतीचे जग, त्यांत मिळुनि जाई
रुक्मिणि म्हणजे रुक्मिणीच ती, दुसरी नाहिं कुणी
समरस होता, प्रेक्षक जाई विदर्भांत, त्या क्षणीं

जिवंत साऱ्या भूमिकाच ह्या, मिळविति त्या नांवा
भक्ति–करुण–शृंगार रसांचा मूर्तिमंत ठेवा
अतुल भाग्य लाभले जयाला नटहि असामान्य
श्रोते, प्रेक्षक, रसिकहि झाले त्रिवार ते धन्य !

(पादाकुलक)

अलका–अमरावतीचें वैभव
एकवटे जणुं रंगभूमिवर
त्यांत ऊर्वशी ‘ नारायण ’ तर
वरुनि खालि ये गंधर्वनगर
काय विचारावा मग गौरव !

नव्हता नट तो गायक नुसता
सौंदर्याची किंवा पुतळी
शापित देवी वा अवतरली
हांसत नाचत भूवर आली
ललितकलांचे आगर होता !

मालक तो तर या संस्थेचा
सारा नटगण त्याच्यापाशीं
समभावानें वागे त्यांशी
भेदभाव कधि धरि न मानसी
मान राखितो तो सकलांचा !

अविभक्त जणू कुटुंब त्याचे
अपूर्व ऐसे भोजन देई
प्रकृतिचीही काळजी घेई
औषध–पाणी कुणास कांहीं
खूष राहती जीव नटांचे !

(शार्दूलविक्रीडित)

धारातीर्थ पराक्रमास अवघे कां क्षेत्र तें एकलें ?
जेथें तामस रक्तरंजित खलां जे रानही मोकळें
जेथें भीषण क्रौर्य चालत असे संपत्तिही आसुरी
आहे एक पराक्रमास दुसरें तें क्षेत्र या भूवरी

(स्रग्धरा)

क्षेत्रीं येथें कलेच्या स्वर–मधुर अशी सूरसंपत्ति होती.
गाऊनी गोड कंठे उधळुनी दिधले सुस्वरांचेचि मोती
जिंकोनी घेतलेले रसिक नित, अशा विक्रमा कां न अर्थ ?
रूपानें गायनानें अभिनय–सुगुणे कां करावी न शर्थ ?

(भुजंगप्रयात)

कलाक्षेत्रिचा सूर–मल्हार होता
तसा एकला नाट्य–मार्तंड जेता
असे शांत तो, रूप–लावण्य अंगी
अशी तीक्ष्ण शास्त्रें जयाची तिरंगी.

(मिश्रवृत्त)

परमवीरचक्राचा होता ‘ नारायण ’ तो मानकरी
वीर पुरुष कां त्या न म्हणावे ?–असें वाटतें खरोखरी.
असंख्य रसिका घायाळ करी, जायबंदि त्यांना केलें
शरण आणुनी त्यांच्यावर जणुं राज्य तयानें केलें.

(मिश्रवृत्त)

‘ किर्लोस्करां ’च्या त्या जुन्या संस्थेत नाट्याचे धडे
घेउनी मग थाटिले ‘ संस्थान ’ जणुं अपुलें पुढें
‘ कृष्ण-प्रभाकर ’ पाठिशी ‘ नारायणाच्या कौतुकें
शुभ पुष्य-नक्षत्रावरी शुभयोग जुळले नेटके

टेंबे नि बोडस जाणते नट ‘ बालगंधर्वा ’ सवें
‘ गंधर्व नाटक मंडळी ’ स्थापूनि नांव दिलें नवें
शिकवावया आमंत्रिले निष्णात ‘ देवल ’ शिक्षका
बुधवारि एका नीटसा प्रारंभ केला नाटका

दिन पांचवा जुलईतला तेरा सनांतिल उत्तम
सारी व्यवस्था होउनी जुळला मनोज्ञहि संगम

गेला तदा ' सर भालचंद्रांच्या ' करे पडदा वरी
केलें सुरू तैं ' मूकनायक ' ह्या प्रयोगा सत्वरी
श्रीमंत ' सेनाखासखेल ' ' सयाजि गायकवाड ' ते
संस्थेस देउनि आश्रया दावीति नाट्यप्रीतितें
दरसालिं पांच हजार मानधनाचियारूपीं दिलें
पांच प्रयोगा दाविणे येता निमंत्रण तेथले
दाता मिळे संस्थेस, हो उत्कर्ष, वाढे वैभव
परि खास दाता तो-मराठी-रसिक-मनिंचा गौरव.

(छंद देवीवर)

मराठीची नाट्यकला तिच्या इतिहासी एक
सुवर्णाच्या अक्षरांचे पान उघडे सुरेख
श्रेष्ठ गायक जाहले नव्या संस्थेंत दाखल
दूरवर पसरला लौकिकाचा परिमल.

( आर्या )

नाटककर्ते, गायक, वादक, नट साथ देति शुद्धमती
किर्लोस्कर, देवल अन् खाडिलकर थोर नाटके लिहिती
ऐशी हो सुरूवातहि खेळ करिती नव, तसेच तेच जुने
स्त्री भूमिका कराया योग्य नटांचीच होति आगमनें

दिंडी

' प्रेमशोधन ' ' तैं मूकनायका' ला
' गुप्तमंजुष ' तैं ' शापसंभ्रमा' ला
' मृच्छकटिका' ला ' विक्रमोर्वशीया '
' रामराज्यवियोगा' स ' शारदा ' या

( छंद-देवीवर)

' विद्याहरण ' ' द्रौपदी,' ' सौभद्र ' नि ' शाकुंतल '
' एकच प्याला ' नि ' मेनका ' तसें ' संशय कल्लोळ '

'स्वयंवर' नि 'सावित्री' 'कान्होपात्रा' भक्तिपूर्ण
तसे 'अमृतसिद्धी' ही सारी नाटकेंच छान !
गांवोगांवीं जाई दौरा साऱ्या महाराष्ट्रभर
सुरूं 'मानापमाना'नें अखेरीला 'स्वयंवर'

(छंद-देवीवर)

नाहीं 'नाइट' वरती          कधी नटा पाचारण
कंपनीच्याच 'बिऱ्हाडी'        सारे गुण्यागोविंदानं
पाठांतर मनी नीट           नट केव्हांही तयार
सदा घोटून घेतसे            पक्का तालीम मास्तर

रोज रियाझ होतसे           नाटकांतील पदांचा
नाहीं आळस कोणाला         त्याच त्याच तालमीचा
पंगतींत बसताती            एका-मालक सेवक
चालें समान वाढप           अन्न सुग्रास पौष्टिक

नको उणेपणा कोठें          कमतरताही कुठें
रंगभूमी सजावट             मोठ्या वैभवांत थाटे
लोड, गालिचे जरीचे,        किनखापी, मखमली
शाल्, शेले, अंगरखे,        जरिपट्टे उंची शाली

चकचकीत सोन्याचे,         हिऱ्यामोत्यांचे दागिने
माळा टपोर मोत्यांच्या       सारीं नेटकीं भूषणें.
शिरोभूषणें चादीचीं          वरि पाणी सोनियाचें
रम्य प्रकाश योजना          खास वैभव संस्थेचे

किती तऱ्हेचे पडदे           महालांचे, बगीचांचे
राजरस्त्यांचे, रानांचे,       उपवन--गोशालेचे
कधी मेघमंडळाचे            कधी तारामंडळाचे
दृश्य कधी मंचावरी          खरोखरी पावसाचें

किती राजेशाही षोक         मंडप नि राजवाडे
कधी गाई जमलेल्या          कधी वाघ, रथ, घोडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 9C329

नाग भीषण येतसे कधी भडके वणवा
उंची आसनें, झोपाळे, मंचक ते समया वा
बदलती देखावे ते क्षणभरीच्या अंधारी
फिरता नि सरकता नसे रंगमंच जरी.

(छंद जीवनलहरी)

मखमली पडदा प्रथम नव्हता
श्रीकृष्णासंगती राधा नि गोमाता
राधेच्या रूपांत स्वतः 'नारायण'
पडद्यावरील चित्र कसें छान
ध्वनिक्षेपकही त्याकाळीं नसती
प्रेक्षागृहीं तरी कोणी ना रुसती
ऐकू येती सारे स्वच्छ शब्द स्वर
सारे नीट दिसे रसिक आतूर

(छंद जीवनलहरी)

'कादरबक्षां'च्या सारंगीचा गज
अचूक पकडी स्वरांचे सावज
'राजण्णा'चा हात मुलायम भारी
खट्के, हरकती घेई तो लकेरी
ऑर्गन चाले तो पदांसंगतीनें
दावी तनायत स्वरांची वळणें
'तिरखवाँ' काढी तालांतून शब्द
साथीचे कसब श्रोते होती लुब्ध

(छंद देवीवर)

नवरसामाजी त्याला आवडते होते खास
जसे करुण, शृंगार तसे भक्ति, शांत रस
दावी मानापमानांत वीर-रस आविष्कार
तलवारीचे दो हात सारे चोरटे पसार

केली चोरांशी लढाई लुटुपुटीची नव्हती
भासे 'नारायण' तेव्हां जणूं वीरांगनाच ती
सावित्रीच्या भूमिकेत दिसे धैर्य, निष्ठा, प्रीती
शृंगाराचे बारकावे मुग्ध प्रेमाचे संगती
रुक्मिणीचे काय सांगू? 'स्वगतें' ती बहारीची
लडिवाळ शृंगाराची मौज स्वप्नरंजनाची
देवयानीचा होतसे कचासाठीं जीव वेडा
गुंजारव प्रीतीचा तो पुष्पसुगंधी केवढा !
शकुंतलेच्या जीवाची फार होई ओढाताण
तळमळ, कासाविशी अशा भावनांना स्थान
द्रौपदीचे तेज, सत्त्व आणि उन्मत्त भावना
साकारूनी भिन्न भाव यश येई 'नारायणा'
दिसे मीरा भक्तिपूर्ण महाराणी ती विरक्त
येती करुण प्रसंग श्रोते पहाया आसक्त
मूर्त करुणरसाचे चित्र भासले सिंधूचे
रडूनीया रडवी तो नेत्र साऱ्या प्रेक्षकांचे
गणिकेची प्रीतीभक्ती दावी वसंतसेना ती
भिन्न प्रकारांनी दावी कान्होपात्रा नि रेवती
परी नाहीं जमलेला तया हास्यरस कधी
रौद्र भयानक ऐसें नाहीं दिसलें अगदीं

## अरे वेड्या मना तळमळसी—(संगीत शाकुंतल)

(मिश्रवृत्त)

रंगभूमिच्या उत्कर्षाची नांदी ऐसे नाटक तें
कलाहीन नाट्याला प्रेक्षक कंटाळुनि गेले होते.
धांगडधिंगा जुन्या कालिचा सदभिरूची नाहीं कोठें
सुबुद्ध ऐशी करमणूक ना रसिकांच्या हृदया भेटे.

नवीन दालन जणूं उघडले रंगभूमिच्या इतिहासी
शिल्प मनोहर क्रांतीचें हें काव्य-नाट्य-रस एकमुसीं
नवे, नेटके, डौलदारसें रूप लाभलें नाट्याला
संगीताचें नवीन लेणें, नवें वळण दिधलें त्याला

नाट्यमहर्षी किर्लोस्कर ते श्रेयाचे ह्या मानकरी
अनुरूप असे फेरबदलही त्यांनीं केले परोपरी
नाट्यप्रकारी—संवाद, कथा, स्वभावपरिपोषहि आला
नेपथ्य नवें, केशवेषभूषेचा डौल नवा बनला
कविकुलगुरूच्या मूळ नाटका मराठी असा अनुवाद
आवडलें तें रसिकां दिधलें धन्यवाद, पसरे गंध.

(पादाकुलक)

सहकुटुंब-परिवारासह ते
नाटकास या प्रेक्षक येती।
नाट्यकला अन् गानकलेची
सुयोग्य भूमी शोभतसे ती।

उत्कर्षाची कमान चढली
कामगिरी ही उत्तम झाली
पाया घालुनि कला-प्रांगणीं।
पराक्रमाचा वैभवशाली

कीर्ति मन्दिर नवें उभारूनि
कालखंड तो शुद्ध-कांचनीं।

कळस चढविला ' गंधर्वा 'नें
सोन्यालाही सुगंध आला
गुरुद्वादशी सुमुहूर्तावर
' नारायण ' ये नटावयाला.

(मिश्रवृत्त)

शकुंतलेच्या वेषामाजी साक्षात् ऋषिकन्या भासे
सार्थक झालें नेत्रांचेंही प्रेक्षका तदा वाटतसें
शालीन परी मदनाविव्हला मानसकन्या कण्वाची
शोभुनि दिसला ' नागयण ' तो गोष्ट असे अभिमानाची
दर्भांकुर तो पायीं रूतला, पदर अडकला झाडाला
करुनि बहाणा, फसवि सखिजनां, पुन्हां बघे दुष्यन्ताला
नजर चोरटी, साधी भोळी शकुंतला-घे नवरीती
साधा वेष-' परी शोभतसे जातीच्या सुंदरा अती. '

(छंद जीवनलहरी)

' अरे वेड्या मना-तळमळसी कां
उगाच तूं असा ' ? पुसते नायिका
स्वरांचें वैचित्र्य लयींत अक्षरें
घोळून गातांना भाव ते बावरे
शृंगार-करुण रस जागीं एका
पाहून ऐकून संतोष प्रेक्षका
रूपावर खूष दुष्यन्त नायक
त्याच्यासम झाले सारेच प्रेक्षक
भावपूर्ण तिचा आरक्त चेहेरा
केव्हां अश्रूपूर्ण कधी गोरामोरा
कडाडून घेई टाळी ' नारायण '
त्याचे त्याला शोभे अभिनय-गान
किर्लोस्कर संस्था होती दुःखीकष्टी
प्रमुख नायिका हरपली होती

‘ भाऊराव ’ जातां जाहली पोकळी
परीं ‘ नारायणे ’ भरून काढली
संस्थेचें कीं जणूं सौभाग्य परतें
‘ बालगंधर्वा ’चें कौतुक चालतें
तेव्हांपासूनिया होऊनि प्रसन्न
भूमिका करितो प्रकृतीच्या भिन्न
डोळ्यांपुढें त्याची ठेवूनीया मूर्ती
नाटककारही नाटकें लिहिती

(शिखरिणी)

नवी क्रांती झाली इथुन पुढती पद्यविषयीं
नव्या या संगीता नविनचि तऱ्हा येति समयीं
नव्या चाली, साक्या दणदणीत दिंड्या सुबकशा
नवी वृत्तें, गीतें, परिचित तऱ्हा त्यांतहि अशा

(चामराख्य)

नवीन रंगभूवरी दिसे महान् शक्ति ती
दिसें कुठेंच संगिताविना न एकही कृती
रसानुकूलता, सुबोधता पदांत पोषक
वाढला तयामुळें जनांत नांव लौकिक
सुवासिनीस भालिं शोभतेंच लाल कुंकुम
स्थान तेंच संगितास, पुढतिं हा उपक्रम
भावनिष्ठ गायकी विभिन्न रूचिस आवडे
तुष्ट रसिक स्वागतास करिति तेथ केवढें !

‘ वद जाऊं कुणाला शरण ? ’—( संगीत सौभद्र )

(शिखरिणी)

कुणाला मी जाऊं शरण सखये, सांग मजला
हरी जो दुःखातें नर कुणि असे माहित तुला
अगे माझें सारें गुपित हरिला ठाऊक असें
तरी तो कां ऐसा छळित मजला, स्वस्थचि बसे ? ’

(पृथ्वी)

उदास बहु होय ती नच सुचे तिला कांहिही
कसें रूचत तीर्थक्षेत्रि रमणेंच पार्थासही ?
नकोत मज प्राण, दुःस्थिति अशी नको ईश्वरा
जरी प्रियसखा न भेटत तरी नको ही धरा

( आर्या )

पुराणकालिन गोष्टी पार्थ-सुभद्राविवाह-इतिहास
आवडिच्या या विषया नाटयस्वरुपांत मांडिलें खास.
आख्यान आवडीचें, संन्यास पहावयासाचि त्रिदंडी
मोदानें लोकांच्या नाटक बघण्यास धांवती झुंडी.

( छंद देवीवर )

कथानक आवडतें कौटुंबिक मनोहर
प्रतिबिंब संसाराचें त्यांत उघड समोर
जसा शेवट हवांसा वाटे साऱ्या प्रेक्षकांना
झाला तसाच पाहुनी मोद होई जनमना

नाटकाच्या मांडणीची मोहकता कुशलता
लोकप्रियतेनें होई अशा नाटयाची सांगता
आजवरी टिकलेलें रूप नाटयाचें लाघवी
नवीं गीतें, नव्या चाली काय वर्णावी थोरवी

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
४३४९८ दि:

देव, माणसारखे वागतात रामकृष्ण
लटकेच रुसवे ते कारस्थान नि भांडण
भाषा अगदींच सोपी रोजचीच ती ऐकून
विषयही जिव्हाळ्याचा का न व्हावे हो रंजन ?

' किती किती सांगू तुला ' ?– घोळ घोळून गातसे
सुभद्रेच्या दीन जीवा मुळीचही चैन नसे
किती करुण जाहली होई अद्भुत किमया
नकळता भेटवीलें नटवरा पार्थराया

बोले रुक्मिणी वहिनी ' काय झाली बाई स्थिती
काय होतसें तुम्हांला ? वन्सं, वाळलांत अती '
" कशाला हा कळवळा ? सारा कोरडा जिव्हाळा
नकोशी मी झालें काय ? कांहीं सांग ना कृष्णाला "

" काय करूं तरी बाई ? विचारते मीच त्यांना
परी रागवावयाचे तें, कधीं घेती नच मनां
नाहीं दुर्योधनराजा अगदींच असा तसा
सार्वभौमपद त्याचें काय नावडें मानसा ?"

" तुम्हा माहीत सगळें माझा अंत कां पाहतां ?
सानपणींच ठरलें द्यावी सुभद्रा ना पार्था ?
काय शिशुपाल होता वेडा बावळा कीं खुळा ?
कां ग पत्र धाडिलेंस द्वारकेस श्रीकृष्णाला ? "

ओशाळली ती रुक्मिणी तिला सुभद्रा म्हणते
' समजले ग वहिनी ' परदुःख शीतल तें "
—सारा संवाद लाघवी रोजचाच घरोघरीं
प्रेमिकांची ओढाताण पालकांचीं मनें दुरी

अर्जुनाला ज्ञात होती सखी सुभद्रा जवळीं
परी संन्यास तयाचा घालीतसे आळीमिळी
नाइलाजानें सुभद्रा त्याच्या सेवेला तयार
जराही ना मनीं शंका–कीं तो होता पार्थवीर

मनोव्यथा सुभद्रेची नीर आणिते लोचना
असहाय कुमारिका गोड होतसे वंचनां
नाटकाला आहे गोडी आजवरही अवीट
कथा श्रीमंत गृहींची बलराम तो रागीट

कृष्ण–कारस्थान करी भगिनीच्या मनाजोगें
परी उघडपणानें नच तिज कांही सांगें
दुरूनच पाही मौज प्रेक्षकांना दावी
कृष्ण–रुक्मिणी प्रवेश शृंगाराची देई चवी
सारी रसानुकूलता गायनांत, भाषणांत
बहारीचीं सारीं पदें अखेरीच्या मीलनांत

## ‘ कधि करिती लग्न माझें ’—( संगीत शारदा )

(दिंडी)

दृश्य प्रामाणिक वास्तवास ऐसें
समाजाचें प्रतिबिंब त्यांत भासें
मराठी या नाटका रसिकताही
सुखान्तानें संपली कथा तीही
सूत्रधाराची नटी होउनीया
प्रथम पाउल रंगभूमीवरी त्या
‘ इंदिरे ’ची भूमिका करूनीही
नाट्यसंसारचि असा सुरू होई
धुणें झाडित इंदिरा करि प्रवेश
समोरीं ते पाहती निजगृहास
सहज इतुका अभिनयचि होइ खास
गाननैपुण्यें मिळवि कौतुकास

(पृथ्वी)

असे समयिं त्या नवा नटचि बाल ‘ नारायण ’
नमूनि गुरु देवलांस, नित घेतसें शिक्षण
तयेहि समजावुनी दिधली त्या नवी भूमिका
करी बहुत कष्ट, आळस तया नसे ठाउका
अनेक गुण नाटकांत–म्हणुनीच लोकप्रिय
तयांतिल पदें तदा मनिं-मुखीं-असा परिचय
नवीनपण भासलें, परिं जुनेंच तें नेटकें
परि दिसत संगितांत नच क्रांति या नाटकें

(छंद जीवन लहरी)

जरठ-बाला हा विवाह घातक
मोडाया रुढीस ठाकला नायक ।
कोदंडाचा दंड श्रीमंता भोंवला
समाजरूढीचा नायनाट झाला ।

## ‘ रमवाया जाऊं प्रियासी ’ ( संगीत मृच्छकटिक )

कन्यावियोगे आग पेटे, अंतरी हो काहिली
शांत, अभिनय–गान–किरणें तरि मनें संतोषिलीं
दु:ख येवो, संकटांना ना भिणें–हा निश्चय
“ ‘ खेळ ’ बंद न हो कधी, कर्तव्य करण्या कां भय ? ”

(छंद देवीवर)

वारांगनेची भूमिका वठवीण्या सोपी नाहीं
स्वभावाचे बारकावे नट दाखवून देई
आली वसंतसेना ती घाबरूनी मंचावर
तिच्या पाठोपाठ आले चेट, विट नि शकार
पौराणिक राजकन्या नव्हे, होती ती गणिका
अवघड होती जरी नाटकांत या भूमिका
तरी सहजता होती अभिनयांताचि फार
चारुदत्ताच्या घराचे पाही उघडें तें दार
घाबरल्या वृत्तींतही आठवली छान युक्ति
अंधाराचा घे फायदा दिसे वदनीं सत्प्रीती
चेट विटा फसवून शिरे दारांतुनी आंत
समोरच दिसला तो प्रियकर चारुदत्त
‘ दासी ऐसे मानुनीया कार्य सांगे मज ’ जरी
शेला त्याचा मम देहीं ’ धन्य ! ऊब ये अंतरीं
असा प्रीतिभाव दिसे ‘ नारायणा ’च्या वदनीं
नाहीं उथळ शृंगार नाहीं थिल्लर वागणी
‘ काय कळा बाई आली ’ हीच सदनाला ’ बोले
भाव दु:खित तियेचा करितात नेत्र ओले
‘ माडीवरी चल गडे ’ सखे जाऊं झडकरी ’
म्हणताना अधीरता प्रेयसीची दिसे खरी
चारुदत्ताचें चिंतन त्याच्या नांवाला प्रमाण
संवाहकास म्हणून बसावया दे आसन

भेटीसाठीं वेडें मन उदाराचें प्रलोभन
त्याचें निर्धन जीवन तरी मना संजीवन

(छंद जीवन लहरी)

गणिकेचा स्वार्थ कधी न दिसला
कुलीन घरीची वाटली ती बाला
अभिसारिका ती जाई दर्शनाला
परतता संगें चारुदत्त आला
" रजनिनाथ तो नभीं उगवला
राजपंथीं जणुं दीपचि गमला
नवयुवतीच्या निटिलासम तो
ग्रहगण सारा विमल दिसतो
शुभ्र किरणचि तिमीरीं पडती
पंकीं पयाच्या कीं धाराच भोंवती "
' राहूं दे मशाल ' सांगतो मैत्रेया
तुष्ट प्रियकर संगतीस प्रिया

( वसंततिलका )

शालीन, नम्र, मधुमंगलसा स्वभाव
ज्या सद्गुणें मिळविलें अति थोर नांव
दावावयास गणिका बहु प्रेमला ती
घे मर्म ध्यानिं वठली नव भूमिका ती

(छंद जीवन लहरी)

लावणीबाजांत पदें फार छान
गोड गोड गाई घोळून घोळून
पहावया सखा दानशूर मूर्ती
कितिदा पाहते होय नच तृप्ती
प्रीतीची कबूली सखीजवळी दे
गणिका निःस्वार्थी रंगते आनंदें

‘ रमवाया जाई प्रियास ’ गणिका
शुकाच्या भेटीस आतूर सारिका
गगनीं दाटल्या मेघांच्या सांवल्या
पर्जन्य धाराही पडाया लागल्या
पावसांत भेट झाली प्रेमिकांची
जणुं पर्वणीच सांगता प्रीतीची
“ उपकारक तो पर्जन्य जाहला
प्रिया-मीलनाचा लाभ मज झाला ”
–म्हणे चारुदत्त मैत्रेयालागून
“ पुरुष दैवाचा मीच झालो जाण ”
तशा पावसांत मीलन जाहलें
पाणी तें नयना प्रेक्षकांच्या आलें
पावसाचा असा नवीन देखावा
गंधर्व-रंगभूवरीच पहावा

## ‘ खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनीं ’ ( संगीत मानापमान )

(दिंडी)

खास ‘ नारायणराव राजहंसा ’
यश मिळोनी, शोभेल त्यास ऐसा
यत्न केला ‘ कृष्ण प्रभाकरां ’नी
रचियेलें तें ‘ मानापमान ’ त्यांनीं

नव्या संस्थेला लाभ फार झाला
नवे देखावे वैभवास नेले
‘ भामिनी ’नें यश दिलें कल्पिलेलें
पात्र नाटक हो रसिक-गौरवाला

( छंद : जीवनलहरी )

गरीब म्हणजे कस्पट-कचरा
गर्वानें भामिनी दावीतसे तोरा
दुरभिमान, तो श्रीमंती नखरा
अविचारा देई मनांतचि थारा

नको पराक्रम, नको निर्धनता
सौंदर्याचा गर्व—भूषण, अहंता
‘ धनी मीच, कैशी वरूं अधनाला ? ’
—खुशाल करिते सवाल वडिलां
उद्धट असला अभिमान दावी
( जरी ‘ नारायण ’ होता सुस्वभावी)
सुरवातीला ती चिडलेली बाला
—अशीच ‘ भामिनी ’ येई प्रत्ययाला

(पादाकुलक)

रूप बदलुनी हो ‘ वनमाला ’
प्रीतीचा तिज अर्थ समजला

पराक्रमांतील सौंदर्याला
मानुं लागली ती मधुबाला
' रणस्नेहाची झाली युवती '
जिंकुनि घेई ' धैर्यधरा ' प्रति
'मोहन कोमल भाव ' प्रकटले
सेवेला मन तयार झालें.
चढाव पुशिले धैर्यधराचे
गर्व गळाला मर्म प्रीतिचे
उमजे तिजला, सुख सांपडलें
सारे ' नारायणे ' दाविलें.

( छद : देवीवर )

प्रेक्षणीय वेषभूषा, रूपसौंदर्याचा गर्व
अंक तिसऱ्यांत शोभे शृंगाराचे तें वैभव
ख्याल गायकीच्या चाली–श्रोत्या मेजवानी झाली
पदापदांच्या लकेरी घेती क्षणोक्षणी टाळी
लोकप्रिय झालें नाट्य फार लौकिक वाढला
श्रेय सारें ' नारायणा '–अभिनय गायनाला

( छंद : जीवनलहरी )

' नाहीं मी बोलत ', ' नाहीं मी बोलत '
पुन्हां पुन्हां म्हणे लडिवाळ गात
नाथावरी रुसे तऱ्हेतऱ्हेनें ती
प्रेक्षकास देई मनांत प्रचिती

( छंद : देवीवर )

शृंगाराचे बारकावे, हावभाव, हेलकावे
दाणेदार-मोतियांच्या ताना घेऊनीया भावे
पुन्हां पुन्हां तीच उक्ती श्रोते रसांत नाहती
दावी लटका रुसवा बाला विनयवती ती

' खरा प्रेमा ना धरीत लोभ मनीं पटलेलें
गाता पद विस्तारानें श्रोत्यांनींही तें जाणलें
' दूती नसेचि ती माला सवतचि भासे ' तिला
प्रियकरास भेटण्या मनीं उत्सुकली बाला

' मदन तो तिला भासे ' होता प्रीती साक्षात्कार
स्वभावांतिल बदल आपोआप हो साकार
' मानापमाना 'च्या पहिल्या प्रयोगा
अनुभवितसे कन्येच्या वियोगा

तरी म्हणे सर्वा—नटांना, ऐकावें
" कुणाच्या मृत्युनें कर्तव्या न भ्यावें "
" होणार ' भामिनी ' खेळ बंद नाहीं "
( मृदु मनाची ही कणखर ग्वाही ) !

' लग्न होइना नाथा तात सहिना–' (संगीत विद्याहरण)

(व्योमगंगा)

' देवयानी, देवयानी, मांडियेलें काय तूं हें ?
फेकुनी देई सुरा ती कां पवित्रचि कर्म हें ?'
देवयानी सौख्य मानी देवपुत्राच्या गुणीं
कंठमाधुर्यांत त्याला मोहवीते कामिनी
आंधळी हो प्रीतिनें ती देवयानी रूपखाणी
शुक्रबाला स्फूर्ति त्याची हो अखेरी विरहिणी

(हरिभगिनी)

" ओठा लावी पेला तूं गे, नको जरा अनमान करूं "
वदले तिजला दैत्यगुरू
" कचदेवांना वाटेल कसे ? कशी प्रेम त्यांचें विसरूं ? "
" कचदेवच हे आले येथें बाबा, त्यां जें नावडतें
कैसे मी आचरीन तें ?
अचल प्रीति मम त्यांच्यावरती, अपमानित कां करुं त्यांते ? "
मद्यपान करणें हें पापच निषेध त्याचा होण्याला
अरुची तैं दावायाला
खास नाटका लिहिलें होतें अनुरूप तया काळाला !
नाट्य तयांतिल अभिनव, परि ती कथा जुनी सर्वा विदित
महाभारतीं मुनि-काथित
गानाभिनये ' गंधर्वा ' नें केलें सर्वांना स्तिमित !
परडी घेउनि फुलें तोडिता चुकामूक हो नवलाची
देवयानि, कच दोघांची
' ज्या सुमनावर नसे भ्रमर तें आणावें '–आज्ञा जाची !
' मधुकर वनवन फिरत करी तो गुंजारव ' मधुमधुर अति
गाणें गाई अतिप्रीती
देवयानि ती सर्वांगानें शोभुनि दिसली मूर्त रती !
कचप्रेमानें आग्रह करिते ' संजीवन त्या द्या बाबा '
दैत्य लाजवी कसाबा

वियोगदु:खा घाबरलेली, शुक्र प्रीतिला देत मुभा !
आचार्यांचें मूर्तिमंत तप कविबाला–रूपें प्रकटे
लावण्यश्री कीं विनटे
पुन्हां पुन्हां ती सजीव करण्या कचदेवा, विनवीत हटे
अखेरीस तो विद्या हरुनी जात असे स्वर्गीं परत
भागिनी ‘ अक्का ’ तिज वदत
‘ तात मानितो आचार्या मी, निरोप दे तूं मज हंसत !
‘ बंधु धाकटा मानिन त्या मी ’ ( ज्या मानियले पतिदेव)
माझे माझे कचदेव
त्याग परंतू हवा कराया, त्यांतच गौरव, हें दैव !
व्याकुळली ती, परी मार्ग ना दुसरा तिजपुढती उरला
तिलांजली दे प्रीतीला
नाट्य तयांतील करुणरसानें भारुनि टाकितसे सकलां !
भग्न प्रीतीची तडफड, तैशी नव प्रीतीतिल नाजुकता
स्वभावांतली विशेषता
लडिवाळ, तशी तेजस्वी ती, लाडिक, त्यागी शुक्रसुता !
छटा सर्व या दावियल्या, गायनास पैलू येत नवा
झाली त्याची किति वाहवा !
‘ म्हणता तुम्ही देवयानि ती नाहीं मी हो कच देवा
कचास ऐसा आग्रह करिते ‘ मद्यचषक ओठा लावा ’
‘ शब्द न असुरांना द्यावा;’
बोलुनि ऐसे संकटिं टाकी पित्यास, रक्षी कचदेवा !
‘ कशी न दिसते ममता ’ म्हणता दूर करावे विघ्न म्हणें
कचावरील प्रीतीनें
बहारदारही प्रवेश ऐसे किती दावितो नाट्यगुणें !
शृंगारा प्राधान्य नाटकीं, शोकान्त असे दावियला
दावित भिन्न भावनेला
प्रेम कचाचें, भीति पित्याची, तिरस्कारि युवराजाला !
सखोलता अभिनयांत, तैसे कौशल्य दिसे ‘ स्वगतां ’त
शब्द करूनिया शतगुणित

नाटककारे अपेक्षिलेला अर्थ वाढवुनि देइ नट !
केस मोकळे, हातीं परडी, मधुकर- सुमनांची सृष्टी
लोभसवाणी ती मूर्ती
ओवाळुनि टाकावे पांचहि प्राण जणूं प्रेक्षक म्हणती !

## ' स्वकुल तारक सुता ' ( संगीत स्वयंवर )

( जाति : हरिभगिनी )

प्राजक्ताचा सडा सुगंधी दंवात भिजलेला
पडावा जसा पहाटेला
तसे शब्द, स्वर रसांत भिजुनी येति प्रत्ययाला !
श्रीकृष्णाला येता पाहुनि गेली गोंधळुनी
लाजरी राजसुता रुक्मिणी
घाइघाइनें जिना उतरता हरखुनि गेली मनीं !
' दादा, ते आले ना ?'—आले शब्द जिन्यावरुनी
मोद ना मावतसे नयनीं
' सामोरे कां नको जावया ? '–उत्सुकता लोचनीं !
संबोधुनि बंधूला ऐसे आपण येई पुढें
दर्शनें मन झालें वेडें
लव लज्जेनें, अधीरतेनें पुढील शब्द अडे !
रुक्मीला समजे न कोठुनी कोण तिथे आलें
पुन्हां ती तेंच तेंच बोले
मुग्ध लाजरे वदन बघोनी भावाला उमजलें !
दगलबाज तो शत्रू आला गवळी श्रीकृष्ण
गेला रुक्मी संतापुन
सुरू जाहलें नाट्य अचानक नाटकांत तेथुन !
कुमारिकेच्या प्रेमळ अन्तःकरणाची ओढ
प्रीतिचें दर्शन दे मोद
खरेंच कीं हें सारें ? अभिनय काय स्वप्नगूढ ?
म्हणे ' नाथ हा माझा मोही खलाच शिशुपाला
तैसा माझ्या भावाला
मनांत कल्पुनि पत्नीपण, ती करी स्वागताला !
स्वयंवराचें आमंत्रण त्या दिधलें नव्हतें कुणी
साहसी युवक कृष्ण सद्गुणी

खला पकडुनी येता दिसली ' सन्मुख ती रुक्मिणी '
उतावीळपण साहस तैसे युवकाला शोभलें
दर्शन सात्त्विक तें आगळें
म्हणे ' नरवरा, आराम करा '–' नयनें ' ती ' बोले ' !
झालें स्वागत अपूर्व ऐसे नरवर कृष्णाचें
कामहि नाहीं वाचेचें
मनोमनीं ती कृतार्थ, नाहीं भय शिशुपालाचें !
सांगे जाउनि सारे घडलें अपुल्या प्रिय सखिला
' मीच ती भाग्यवतीबाला '
' मलाच झालें दर्शन देणें प्रथम, ना कुणाला ' !
' तेच ते, असे मी ओळखिले, ओळखिलें त्यांनीं
' खरें कां हें सारे रुक्मिणी ? '
–सखिनें पुसता, लाजुनि गेली, गेली ती हरवुनी !
प्रवेश इतुका पाहुनीच ते प्रेक्षक आनंदले
पारणें नयनांचें फिटलें
अभिनय-गायन-नाट्य पाहुनी अमृतांत न्हाले !
कृष्ण-रुक्मिणी चरित्रांतली उदात्तता सारी
प्रीतिची सात्त्विकता साजिरी
नाटककारें-कविकृष्णानें दावियली ती खरी !
कसें असावें प्रेम ? भक्ति हें प्रीतीचें रूप
दाविलें सुंदर अपरूप
संकटांस ना भ्यावें, नाहीं सत्प्रीती पाप !
–संदेश असा दिधला युवका-युवतींना येथें
नसावा उथळपणा प्रीतितें
' तारक होती सुताच वरुनी सुवरा स्वकुलातें ' !
' नारायण-गंधर्वा ' करिता खास तयें लिहिलें
तयानें समजुनिया घेतले
साक्षात् रुक्मिणी रंगमंचकीं अमोल दर्शन घडलें !
शृंगाराचें घडलें दर्शन कृष्ण-रुक्मिणीविना
काव्य तें कळलें नयनांना

संयम कोठें सुटला नाहीं, ओळखिल्या भावना !
' सद्धर्माची, सौंदर्याची खाण रुक्मिणी असे
लौकिक असा मनांत वसे
निर्मल अन्तःकरणाची ती मूर्तिमंत भासे !
स्वयंवराचा हक्क सोडिला धीट अंगनेनें
स्वसुखा त्यागियलेही तिनें
स्वकीय संहाराचें भय तिज ' गुरुच ' कृष्ण म्हणे !
सांभाळाया मान प्रतिष्ठा विदर्भ देशाची
तशी ती अपुल्या वंशाची
प्रार्थितसे देवीस ' ठेव मम तुजजवळीच सुखाची ' !
' लग्न मोडले रुक्मिणिचे ' हें ' होय मनासारखे '
खल ते वदति एकसारखे
विषण्ण झाली क्षणीं, मन तदा सौख्याला पारखे !
श्रद्धा ठेवुनि मनांत होई दंग स्वप्नरंजनीं
महालाबाहिर ये रमणी
राजवैभवा विसरुनि होई गवळण मनोमनीं !
जणुं चालली जलभरणाला यमुना तीरावरी
घेऊन घट तो अपुल्या शिरीं
तेवढ्यांत ये चाहुल तिजला आलें कोणी तरी !
' अशीच अपुली करीन सेवा, कष्ट वाटतील ना '
केलें ' यदूमनीं सदना '
' प्रेम न जाई दुजाकडे, मन वळें न प्रलोभना ' !
' मोहवीन मी कंठबलानें देवा, अपुल्याला
वाटतें ' मी राधाबाला '
' द्वारकेहूनी एकदांच गोकुळिं न्या गोपाला ' !
' मारायाचा खडा न देवा–होईन ओलेती
आवडे ना मज ही रीती '
एकसारखे काय मजकडे बघता अतिप्रीती !
मला नाहीं हो खपायचें हें ' मी तर नृपकन्या
राजा कृष्णाची जाया

लाज वाटते मला ग बाई, आतां सत्वर या ' !
दिवास्वप्न ती गाऊं लागली मनिंचें संगीत
भोंवती गाई जमतात

नवल वाटलें-गोकुळांत कां मी ? हो स्वप्नांत !
माता माझी म्हणते ' माझी बाळी हो शाहणी '
कळा ना मज, मीच अडाणी

मला न येतें दूध काढता, ' मदत करिल कां कुणी ? ' !
प्रामाणिक तैं विनम्र, प्रेमळ, उदार त्यागी सुता
लाडकी ती भीष्मकदुहिता

प्रसंग येतिल तशी वरितसे कणखरता, लीनता !
अमाप लाभे लोकप्रियता सुंदर या नाटका
मोहक रुक्मिणिची भूमिका

गुंगविणाऱ्या गोड गायनें सुखवियलें रसिका !
नाजुकसाजुक अभिनय, वाक्यें तोलुनि बोलतसे
भक्तिचे अधिष्ठान खासें

तन्मयतेनें प्रियकर वर्णन करताना ती दिसे !
भूमिकेत त्या समरस होउनि, होणे तल्लीन
आपण नाहीं ' नारायण '

मर्म घेउन ध्यानिं, वागला अपार श्रम घेउन !
पदोपदीं ये प्रत्यय- दिसला अभिनयांत गायनीं
म्हणतसे ' मीच पट्टराणी '

' अशी कोण ही राधा ? '-पुसता मत्सर तो वदनीं !
रुक्मिणी म्हणजे रुक्मिणीच ती, नाहीं दुसरी कुणी
येतसे खरीच साकारुनी

प्रेक्षक जाती त्रिदर्भदेशीं अजबचि ती मोहिनी !
' स्वयंवरा ' या म्हणती ' गंधर्वांचा हा जलसा '
श्रोता होई वेडापिसा

प्रेक्षकमनिं एकदां उमटला, पुसला ना कधि ठसा !

असंख्य वेळा पाहुनि नाटक, पुन्हां पुन्हां पाहती
नाना रसांत ओलावती
' पुन्हां गा, पुन्हां ' पदें गोड तीं श्रवणिं न हो तृप्ती !
आनंदाचें भरतें येई, कौतुक मनिं दाटतें
पहावें एकदां तरी तें
—जन्मा येउनि ' गंधर्वांचें स्वयंवर' चि वाटतें !

‘ असे पति देवाचि ललनाना ’ —( संगीत एकच प्याला )

(आर्या)

‘ गंधर्व ’–‘ गडकरी ’ युति बलवत्तर योग ‘ मंडळी ’ ला तो
कुबेर–भांडाराचें ऐश्वर्यानें प्रयोग तो खुलतो
‘ द्यावें मज नाटक हो तुमचे ’ धरिलेंच आग्रहा फार
‘ राम–गणेश ’ म्हणाले, ‘ विसरा शाल्ह तसे अलंकार ’
घेई ‘ एकच प्याला ’ जिद्दीनें, लावुनींहि पैज मुदें
‘ विसरूनि शाल्ह भरजरी, नेशिन मी गोणपाटहि मोदे
गरिबा–घरची होइन आर्य-स्त्री हीन-दीन वेषांत
माझ्या अभिनय–कंठे करिन तिला खचित मीच श्रीमंत ’

(दिंडी)

सुबक लुगडें नेसून नऊ वारी
नाकिं नथ घालित गर्भवती नारी
जात माहेरा, भाई वियोगाची–
‘ हृदयिं लागे हुरहुर ’ तिला साची

वकीलाचें घर–दूरध्वनी वाजे
धना तोटा ना, प्रीति त्यांत साजे
पतिपत्नींचा मनोहर प्रवेश
पुढ त्याचा ना राहि मागमूस

जात पत्नी, हो विरहही पतीला
तिचें ‘ मानस कां बधिर ’ त्या घडीला
प्रीति वेलीला बहरणार फूल
कशा व्हावें मग हृदय तें मलूल ?

(मिश्रवृत्त)

कचेरीत अपमान होतसे सहन होइना सुधाकरा
विसरायाला तीव्र वेदना उपाय खासा–पिणें सुरा

बुद्धिमान तो गृहस्थ तैसा स्वाभिमान त्याच्यात पुरा
होय दुर्दशा व्यसनानें, तैं संसाराचा होय चुरा
तळिरामानें तया लाविलें खुशाल अपुल्या नादाला
' दादासाहेब ' खुशाल लावा ' एकच प्याला ' ओठाला
भीत भीत घेतला स्वाद तो येत नशा, पडला विसर
हवेहवेसे वाटून घेई प्याल्यावर प्याले फार
व्यसन जाहलें, वाढूं लागलें, धन-मानहि सारें गेलें
दारूच्या दुष्परिणामा हें नाटक दावाया रचिलें
परतुनि येई सिंधू, संगे बाळ तिचा गोजिरवाणा
रंगरूप तें गृहिचें पाहुनि हळहळली, दुःखित वदना

(छंद : जीवनलहरी)

पहिल्या अंकाचा नूर पालटला
करूण रसाला पूर तेथें आला
आर्यस्त्री-भूमिका अविस्मरणीय
पूर्णत्व मिळावें असा अभिनय
फाटके लुगडे शोभून दिसलें
दळण दळिता महावस्त्र झालें
घरघर नच जात्याची श्रवणीं
मधु-गुंजारव जणुं येई कानीं
' चंद्र चवथीचा ' साथीला साजेसा
साध्या स्त्रीगीताला झोंक सहजसा
' रामाच्या बागेत चाफा नवतीचा '
गाता परिपोष करूण रसाचा
अंगी रोमांचानें कांटा थरथरे
एकाच ओळीत असंख्य काहुरे

(छंद : देवीवर)

मातृ-वात्सल्याचे दृश्य पायावरी घेई बाळा
' घांस घे रे तान्ह्या बाळा गोविंदा रे तूं गोपाळा

गात गात भरविते दारिद्र्याचा गोड घांस
त्या त्या प्रसंगांत शोभे गोड स्वरांचा विलास
साधे-सुधे स्त्रीगीत तें भावपूर्ण, रसपूर्ण
साधे ना स्त्रियांना, तैसे मनीं ताजी आठवण
अंका अंकातून दिसे कारुण्याची छाया दाट
असहायता, कारुण्य मुद्रेवर कांठोकांठ
शृंगारीक नाटकाचा कोठें लाडिकपणा ना
तिच्या तेजस्वीपणानें दारिद्र्या ये मोठेंपणा
धवळून टाकी तेज ऐसें पदोपदीं भासें
तिच्या रडण्यासवेंही प्रेक्षकही आंसू पुसे
दारू सोडली नाथानें कळतांच आनंदली
'खरं ना हें?'-नाथा म्हणे बाळा सांगण्या धावली
म्हणे 'स्वस्थ कसा रे तूं? –उठ गड्या उड्या टाक'
आंसू-हांसूचें मिश्रण विरघळले प्रेक्षक
तिचा आनंद उत्साह, चापल्य, ती गडबड
सारे प्रथम अंकांत मग सारी रडारड
केव्हां म्हणे, 'प्रभु ऐसा मजवरी कां कोपला?'
हळहळ जनमना जैशी सिंधूच्या मनाला
'दया छाया कशी घेई प्रभु निवारूनिया तो?'
जीवनासी आधार जो कसा लोपला गुरू तो?'
दारिद्र्यांत, कारुण्यांत तेजस्वीपणा दाविला
बंधु–जनकाला म्हणे– 'कशी त्यजूं या पदाला?'
'पति असे ललनांना देवचि' हें मी मानीतें
'सत्य वदे वचनाला नाथा, गृह न सोडिते
नाथा, आपुलीच आण स्वर्लोकी ना हे चरण'

सारी पदें गझलाची त्याचे रूपांतर केले
नीट मराठीकरण गंधर्वाच्या गानें झालें
ख्याल, गायकी, ठुमरी कवालीचे सारे ढंग
पूर्ण पचनीं पाडूनी 'नारायण' गानीं दंग

(छंद जीवनलहरी)

‘ सुंदराबाई ’ च्या    गोड धुंद चाली
‘ गुर्जरांनी ’ पदें    उचित रचिली
‘ रामगणेशां ’चे    सुंदर नाटक
परी पहावया    नव्हता लेखक

अन्नछत्राचाच रस्ता    दावी गीताबाई जेव्हां
तिच्या चरणीं मस्तक    ठेवीतसे सिंधू तेव्हां
एका वकीलाची पत्नी    दारिद्रयानें हो लाचार
कारकून पत्नी गीता    देई वेळेला आधार
‘ मज जन्म देई माता    परि पोषिले हो तुम्ही ’
मूर्तिमंत कारुण्यानें    उदास हो रंगभूमि

(छंद : देवीवर)

“ सुधाकरानें मुलाला    मारिलें कां, सांगा बाई ”
विचारीतो फौजदार    सिंधूला, तो करी घाई
“ नाहीं तिकडचा कांहीं    अपराध यांत बरें
मीच घेऊन मुलाला    खालीं येत होते त्वरें
घेरी येऊन पडले    कांहीं मज नुमजलें
अंगाखाली अहो माझ्या    माझे मूल चेंगरले ”

पुण्यपवित्र देवता    वाचवीते पतिदेवा
सारा प्रसंग असा कीं    जीव वाटे ओवाळावा
साऱ्या नाटकांत दिसे    कारुण्याचा परिपोष
तिचें दुर्दैव पाहता    जीव होई कासावीस

गेली सिंधू गेली देवी    पतिव्रता निष्ठावंत
पुन्हां दिसणार नाहीं    आतां असली जगांत

## ' संशय कां मनिं आला ? ' —(संगीत संशयकल्लोळ)

(छंद : जीवनलहरी)

नवीन लाभली सुंदर भूमिका
झाला खेळकर रेवती नायिका
पात्रां अभिधानें मासा नक्षत्रांची
जलद् गति ती नाट्य प्रसंगांची

एकदां चढला रंग नाटकाला
उतरे ना खालीं अजून या काला
फार खेळकर सारेंच नाटक
हलवीले तये रसिक प्रेक्षक

हास्य-शृंगाराचें सुरेख मिश्रण
मध्येंच तयांत गांभिर्याचे क्षण
ज्याच्या त्याच्या मनीं संशय सारखा
फाल्गूनराव नि तशीच कृत्तिका

नाटक नवें हें होतें सामाजिक
पदा पाठोपाठ पदें ती सुरेख
' पातली सुकांत चंद्रानना ' इथें
अखेरची तान श्रोत्या रिझविते

' स्वकर शपथ वचनिं वाहिला '
' कर हा करी मी शुभांगे धरिला '
तोडीस तोड तें ऐकता गायन
प्रेक्षकां वाटलें संपू नये क्षण

सात्त्विक स्वभाव बालगंधर्वांचा
राजस भूमिका थाट तो गोव्याचा
जशास तसेंच रेवती वागते
अश्विनशेटजी मनि खिन्न होते

पाहूनच घ्यावी छटा नि छटा ती
प्रियास चिडवी खट्याळ रेवती

'पटली का खूण?' पुसे तो आश्विन
'पट्ली बरं मग?' आविर्भाव छान

'धनिक वणिक' भोळी खुळी बाळे
धरावया त्यास पाशही निराळे'
"गणिका हो आम्ही फसलांत तुम्ही
येऊं नका पुन्हा जरा व्हा संयमी"

चिडवीत अशी निज प्रियकरा
दावितसे त्याला लटका नखरा
विनोद-हास्यानें श्रोते मनीं खूष
पदें करितात रसपरिपोष

दुःखित जाहला सोडून जाताना
पुन्हां पुन्हां येई जाई पुन्हां पुन्हां
"पुन्हां ना येणार रेवती मी जातो
सुखांत तूं राही एवढे इच्छितो

कारण 'मानिली आपुली' एकदा
दुःखशोक नच शिवो तुज कदा"
करूण रसाचा आविर्भाव दिसे
हळहळताना प्रेक्षकही भासे

थट्टेचा असा हा प्रकार चालला
'संशय कां माझा त्यांच्या मनीं आला'
रूखरूख चित्ता चित्र गेले कोठें?
थट्टा वृथा केली काळीज हे तुटे

विषण्ण जाहली परी मनीं येई
हें सारे लटकें खरें नच कांही
जरासा विचार — संबंध जुळला
भेटावया जाई फाल्गूनरावाला

'मजवरी त्यांचे प्रेम खरोखरी'
आनंदाने होई अल्लड सुंदरी

संशयानें सारे झालेले विकल
अंती उलगडे 'संशय कल्लोळ'

(आर्या)

घेई समजावुनिया लेखक–आशय, स्वभाव, भावार्थ
गाभाच भूमिकेचा अभिनय–सुगुणेंचि दावि शतपटित
ओतुनि स्वप्राणांना अजरामर करित शब्द कर्त्यांचें
गाऊनि गोडपणानें मिळवितसे धन्यवाद श्रोत्यांचे

(शार्दूलविक्रीडित)

कोठें भासत ना घृणास्पद असें, अश्लीलता ना कुठें
नाहीं हो मन तें सुजाण कधिही त्या प्रेक्षकांचें विटें
शोभे निर्मल भावनेंत, जरी ती वारांगना रेवती
बेपर्वा, कधि शांत, संशयित वा केव्हां निराशेत ती.

(मिश्रवृत्त)

तीन भूमिका गणिकांच्या त्या राजस-सात्त्विकशा
वसंतसेना, कान्होपात्रा रेवति–ह्या ऐशा
शालीनपणा, भक्ती, प्रीती, निष्ठा अचल खरी
एकेकीची दावित असली भिन्न भूमिका जरी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्र. ८३५७२ दि: ०१.०५
क्रमांक १९३९ नों दि: २५-३-०७

मराठी ग्रंथ संग्रहालय
१८-३०७

## ' ठरला जणुं मत्सर राजा ' (संगीत द्रौपदी)

(स्रग्धरा)

आलेल्या वैभवानें प्रमुदित, हंसली द्रौपदी कौरवा ती
राज्ञी जी पांडवांची, स्मरण करुनि दे अंधपुत्रा प्रचीती
क्रोधाग्नी, मत्सराग्नी भडकुनी त्यजितो केवि माणूसकीला
ती उन्मत्ता म्हणे कीं " सजुनिहि नटवा तो विवाहास आला

दावी तो थाट खोटा, नट जणूं दिसतो कीं रणा साच आला
ना त्यासी मत्स्य नेत्रा दिसत, तरिहि तो बाण लावी धनूला "
ऐसें टोंचून बोले, वदत " मम मनीं मोद हा मावतो ना "
' वैऱ्यांना लाजवीते ' अशिच मयसभा, हांसता राहवेना "

(दिंडी)

भव्य चित्रें भरजरी वस्त्र-लेणीं
मुक्तहस्तें धन दिलें ओघळोनी
पाहुनिया हे थाट वैभवाचे
दिपुनि गेलेले नेत्र प्रेक्षकांचे

(मिश्रवृत्त)

आजवरी ती करीत होती शत्रूंचा उपहास सदा
विकल स्थितिला हांसत होती, हिणवित दावितसे विपदा
पाणउतारा करीत होती–सांपडेल संधी जेव्हां
तोरा अपुला मिरवित होती–सारा अभिनय नवानवा

पंखा घेऊनि येणारी ती अवखळ भामिनिही नव्हती
करांत, परडी, पुष्पे तोडी देवयानि मोहक ना ती
गोकुळच्या स्वप्नांत दंग हो–अशी रुक्मिणीही नच ती
तेजस्वीपण स्त्रीजातीचें दाविण्या उभी द्रौपदि ती

नाटकांत या शांत वीर-शृंगार-रसांना वाव नसे
वृत्ति अचुक सांभाळुनि दावी भूमिकेत जी जिद्द वसे

कसोटीस ‘ गंधर्व ’ उतरले, लौकिक वाढे चहूंकडे
नसे इथें पूर्वींचें ‘ बा ऽ ई ! खरं ना ? हो ? लडिवाळ ‘ गडे ’ !

“ द्यूतामध्यें हरुनि स्वतःला मग पणास मज लावियली ”
स्वातंत्र्य कसें सरलें माझें ? मी दासी ना ?” ती वदली
दर्शन होई तेजस्वी तें, जाइ लया उन्मत्तपणा
परिस्थिती ही ऐसी येता दिसून ये सोज्वळ बाणा !

(छंद : जीवनलहरी)

तपोवृद्धांना ती करिते सवाल
उघड्या डोळ्यांनी कसे हो बघाल ?
धिंडवडे माझ्या अब्रूचे चालले
राजसभेमाजी मख्ख कां बसले ?

( भुजंगप्रयात )

असे पाठीराखा सदा कृष्ण माझा
नको कींव, येईल तो भक्त-काजा
असे भक्त मी तो मला देव वाटे
करी शांत जी आगही येथ पेटे

नसे कांहीं भीति मला कौरवांची
मनीं भक्तिची नांदते ज्योत साची
कितीही छळा, दुःख सोशीन सारे
मनीं खेळतें निर्भयाचेंच वारें

(छंद : देवीवर)

वस्त्रहरण कराया सांगे राजा दुर्योधन
आज्ञा पाळायला लागे निर्लज्ज तो दुःशासन—
‘ अगे बटकीचे पोरी, चाल भराभर ’ म्हणे
डाव उलटला आतां— हंसण्याचे हो रडणें

डोळे मिटून करिते धावा बंधू श्रीकृष्णाचा
असहायतेचा भाव प्रकटला मुखी तिच्या

ओढता तें वस्त्र एक दुजे होतें नेसलेले
नाना रंगी शालू शेले श्रीहरीनें पुरविले

देखावा तो अद्भुतसा पाहताना हरे भान
सारे खरेंच वाटावें असा अभिनय छान
कानशीलें तापलेली जीव भीतीनें गळावा
वस्त्रहरणाचा असा सारा होता तो देखावा

(मिश्रवृत्त)

' क्षत्रिय पांडव, वैभव नाहीं मागायचें आम्हाला
पराक्रमानें मिळवुन घेऊं–' द्रौपदी दे संदेशाला
' निःशस्त्र अशा शत्रूवरती हात न केव्हां उचलावा
ब्रीद नसे हें असुचे म्हणता अधर्म-जाणिव दे तेव्हां

उन्मत्तपणें हंसणें, थट्टा करणें, हेटाळुनि अरिला
दीनपणा तो परिस्थितीचा, तेजस्विपणाही दिसला
भक्ति-श्रद्धा, सत्त्व दाविलें अभिनय उतरे कसोटीला
पांडवांस जों पोंचवितो सम्राटपदा ' तो आळविला

‘ भक्तिभाव हा घ्या सेवा ’-- ( संगीत मेनका )

( भूपति )

आजवरी होत्या राजसुता सुकुमार
लाडांत वाढल्या, करूनी त्या साकार
भूमिका नवी ही, वैभव ना सेवेला
जुंपून दिली तिज सेवेच्या धर्माला
ना दागदागिने, शालु जरीबुट्यांचे
ना वैभव येथें, महाल आणि बगीचे
जरि अप्सराच, ये इन्द्रपुरीहुन खालीं
साधेच वस्त्र भूषणाविना तल्यालेली
परि सुरेख दिसला नट नारायण तोही
सेवेची दासी स्वत: आपणाचि होई
नव पराक्रमाला इथें सांपडे थारा
म्हणुनीच जन्म या सुबुद्ध अभिनय-कारा.
“ ही जळावयाला आले मी हो नाथा ”
“ संताप शांत निज करावयाचा होता. ”
घ्या सेवा माझी पत्नीपदीं मज बसवा
हो ‘ संसाराला भूषण ’--आशी द्यावा
मुनि-आश्रम झाडुनि स्वच्छ करुनिया ठेवी
अत्यंत प्रभावी हीच भूमिका दावी
चापल्य, सफाई, एकरूपता दिसली.
‘ प्रियकरास करूनि वश ’ सार्थकता ल्याली.

अप्सरा मेनका अशी नटविली त्यानें
त्या रागिट विश्वमित्रा भुलवुनि सु--मने.
अडतीस वयाचा नारायण त्या वेळीं
परि वाटे तरुणी वावरते कुणि कवळी

‘ मज वाटे बाई लाज !--म्हणे नवतरुणी
विहिरीतून येता वरती लावण्य खनी

‘ हें काय गडे ! मम पाणिग्रहणहि झाले
‘ देहास दिलें सेवेला ’ यश मज आलें.
‘ हा भक्तिभाव घ्या ’ श्रद्धा नवसा पावे
ऋतु मधु वाणीने जिंकुनि सेवा-भावें
‘ मेनका आश्रमा अलंकार जणुं भासे ’
करुनिया पराक्रम गुरुपदिं चढत अपैसे
‘ तनु मातृपदीं मम बसवा ’ बोले रमणी
लाघवी बोलणे, वशीकरण जणुं ध्यानीं
तो उग्र तपोधन येई शरण तियेला
त्या शकुंत लावण्याला जन्मचि दिधला.

## ' विठ्ठल नामिला पंढरपुरांत ' (संगीत कान्होपात्रा)

(छंद : जीवनलहरी)

वाढत्या वयाला साजेशी भूमिका
' संत कान्होपात्रा ' जरी ती गणिका
पहिल्या अंकांत शृंगार रसांत
अखेरीस होई निराश मनांत

प्रीती असफल बघता बघता
भक्तीत लाभली मनास शांतता
भक्तीची भूमिका परिणाम करी
प्रणयभंगाचे दुःखही विसरी

अभंग शिकवी चोखोबा महार
पांडुरंग भक्ती शिकवी अपार
विसरली प्रेम विसरे निराशा
नवीन जाणीव नवीन ये आशा

लिहूनीया घेई कागदावरती
अभंग अक्षरें चोखोबा सांगती
त्यावेळीं वाटलें लिहीत कीं बाला
मांडी मोडुनीही शुद्धलेखनाला

नाटकीपणा ना परी त्या लेखांत
उपनेत्राविण वाढत्या वयांत
अभिनय परी होता साक्षात्कारी
दुर्लक्ष ना कधी प्रामाणिक भारीं

प्रथम प्रवेश नटे शृंगारांत
भूषण, वसनें- भरजरी पोत
' जरी जातीहीना निर्मल ही कान्हा '
' प्रभुगुणगानीं रमवीत मना

निराशा दुःखीत तिचें तें ' मानस '
भक्तीत, श्रद्धेत ' नुरले उदास '

अभंगाला गोडी फारच वाटली
रसानुकूलता आपोआप आली
साधेसे धवल वस्त्र नेसूनीया
पांडुरंगमय मन तशी काया
अनेक संकटें तिच्यावर आलीं
अटळ श्रद्धेनें निवारून नेलीं
'अवघाचि संसार, सुखाचा करीन'
हातांत बांधलें भक्तीचें कंकण
पंढरपुरीच्या भव्य देवळाचा
देखावा हवा तो हुबेहूब साचा
त्यासाठीं हट्टून खर्च बहू केला
वातावरणांत शोभूनी दिसला
प्रेक्षका संतोष– हेंच समाधान
दावायास हवें सारें छान छान !
अखेरीस जेव्हां विठ्ठल चरणीं
कान्होपात्रा गेली दर्शना लागुनि
तदाकार झाली पंचत्वा पावली
काया निर्जिवशी काष्ठासम केली
निर्जीव व्यक्तीचा अभिनय करी
भूमिका जिवंत दिसे खरोखरी
हळहळले ते प्रेक्षक आलेले
जरी ठाऊक त्या नाटक सगळे

## ' एकवटत जीव जावा, मरणावरि डाव नवा '

( संगीत सावित्री )

( शार्दूलविक्रीडित )

सोन्याच्या बसुनि रथांत ललना ये रंगभूमीवरी
शोभा त्या विजनास येत, चमके रत्नप्रभा साजिरी
मेघ्यारण्य तदा खुलून दिसलें, ये वैभवा कानन
मित्रासंगति सत्यवान बघतो–भाळून गेले मन
झालें जागृत तें कुतूहल म्हणें, मित्रास ' ही कोण रे ?
' कोणीही असुं दे, तुझें वदन कां हें कावरेबावरे?
साक्षीला वटवृक्ष सन्निध उभा–प्रीती जुळे अंतरीं
दृष्टीला मिळतांच दृष्टी ' पहिले नातें जडे अंजिरी !
प्रेमी, सज्जन यौवनांत जरिही सोडीत ना संयम
झाला दोन मनीं विशुद्ध हळवा तो प्रीतिचा संगम
ती घालीत प्रदक्षिणा जरि वटा दृष्टी तयाच्याकडें !'
सेवाभाविक सत्यवान म्हणतो ' हें तों नवें सांकडें !'
' ध्यानीं चिंतनिं हा असाच दिसला ' सावित्रिला वाटलें
मूर्ती हीच मनांतली गवसली–सद्भाग्य हें आगळें
प्रेमा तेथ पवित्रसा विनटला तो सत्यनिष्ठेसवें
सावित्री सु-वरापुढें न गणिते राज्यांतलीं वैभवें
देखावा भुलवी मनास सहजी तो प्रेक्षका रंजवी
प्रीतीची अनुभूति गोड युवती नेत्रास ती रंगवी
गाणी सुस्वर ऐकुनी जन तदा भारीच संतोषले
श्रोत्यांचे मन, कान, भान हरूनी, नाट्यें तयां जिंकिले
' भासे ही नयनीति प्रेमळ, मला ना ने कुमार्गाकडे
सावित्री समजाविते मजासि ती सद्धर्मनीती धडे
बोलूं काय हिच्या सवें, परि असे ही राजकन्या गुणी
मी तो तापस, वित्तहीन विजनीं, सेवकरी मी कुणी '
कां माझ्यावर भाळली ? दिसतसे नातें जुनें आमुचें
नाहीं ही परकी कुणी, समसमा सद्वृत्ति, प्रीती, वचें

साक्षात्कार नवीन प्रीति करिते प्रत्यक्ष तो पाहुनी
श्रोते-प्रेक्षक ' धन्य ! धन्य ! ' म्हणती नाट्यकृती लोचनीं.

(छंद : देवीवर)

" त्यांच्या दोषासहितही
माझे प्रेम त्यांच्यावरी
निष्ठा अढळ मनाची "
-सांगे नारदा सावित्री
निश्चयाचे तेज न्यारे
दिसे गंधर्व-वदनीं
पुढें संकटकाळीही
धैर्य दाविते रमणी
यमधर्मा पाहूनीही
डगमगली ना सती
चाले दोघांचा संवाद
श्रोते थरारले चित्ती
सारे नाट्य प्रेक्षकांना
नेई ओढून त्याकाळी
जेव्हां पुराणांतरीची
कथा खरीच घडली

( छंद : जीवनलहरी )

भव्यदिव्य होते देखावे सुंदर
वणवा पसरे रंगभूमीवर
व्याघ्रसर्प येती सावित्री ना भ्याली
अतीव निष्ठेनें वागता दिसली
तारा मंडळाचे मेघ मंडळाचे
देखाव्याने थक्क मन प्रेक्षकांचे
शृंगार रसाचें लडिवाळ दृश्य
सुमधुर पदें त्यांतिल विशेष

धैर्य, निष्ठा, श्रद्धा, पातिव्रत्य सेवा
साऱ्या भावनांचा अभिनय–ठेवा
नाट्याभिनयाची होई पराकाष्ठा
श्रोत्यांच्या शरीरीं रोमांचाचा कांटा
उतार वयांत भूमिका सजली
तरी ना ' सावित्री ' डोळयांत खुपली
वयाचा हिशोब नाहीं ध्यानीमनीं
अपूर्व दिसली कला ' नारायणी '

‘ तुम बिन मेरी कोन खबर ले ’– ( संगीत अमृतसिद्धी )

(दिंडी)

कुंभराणा तो उदेपूर–वंशी
संत मीरा लाभली स्त्री तयासी
कृष्णभक्तीचा तिला एक चाळा
न ती वैवाहिक मानिते सुखाला

(भुजंगप्रयात)

‘ जणूं पूर्ण भाग्येन्दु माझा उदेला ’
म्हणे ‘ तूंचि दिव्यांगना ’ तो प्रियेला
‘ अशी मन्दिरीं नित्य तूं राहि माझ्या
मला वेड लागे स्वरूपांत तूझ्या ’–

(देवीवर)

,‘ माझ्या जीवितेश्वरा हो, नका नका असे बोलूं
संत समागम सुख कायमचे कसें टाळूं ? ”
“ एकांताच्या शब्दांना गे वेदवाक्यांची महती
महालाच्या शृंगारांत कां ही वैराग्याची वृत्ती ?

तुझा–माझा सहवास हाच संत समागम
तुझ्या माझ्या प्रीतीचा ग घडो येथेंच संगम ”–
“ पूर्वपुण्याईने लाभे असा सहवास मला
रयदासासारखे ते संत पावन मजला

एकनिष्ठेनें वागणें प्रभूवरच्या श्रद्धेनें
हेंच एक मज कळे मज नकोत भूषणें
उंची वस्त्र मज नको हवे साधेसे जीवन
गिरीधर प्रभु माझा माझ्या मना संजीवन ”

नम्र, शांत भक्त मीरा येता प्रसंग तसाच
विद्याशंकर–गुरूला करी ताडन शब्दांचं

जयजयकार व्हावा त्रिभुवनीं श्रीकृष्णाचा
म्हणूनच जन्मली ही बरें मीरेची ही वाचा
अधिकार मज मिळे महाराणीच्या पदाचा
‘ कृष्णनिंदा बंद करा भंग नको हुकुमाचा ’

# चित्रपट-प्रवेश

(मिश्रवृत्त)

रंगभूमिवर करूनि पराक्रम ऐसे कलात्मक
दमला, थकलें शरीर, आतां कोण करील कौतुक
' मायबाप ' ते रुसून जातिल मजवर कां देवा?
सानपणापासून दिला तो कां सरला ठेवा?

जिद्द मनाची तरी स्वस्थ ना बसूं देई त्याला
काय करावें? कसा संपवू कला जीवनाला?
" शोभणार ना रुक्मिणि, सिंधू मी आता ह्यापुढें
रूपें सारी घेईल कां कुणि मजसाठीं ती मुदें?"

रंगभूमिचा वेडा त्याला एक कला-ध्यास
तिचिया ठायी संतत ठेवी श्रद्धा, विश्वास
विचार केला, मतभेद जरी कितीक ते ऐकले
ठाम विचारानेच तयाची पडली नव पाऊलें

' स्त्रीच पाहिजे या कामांना ' नवीन मत मांडिले
आजवरी ना कधिही पटलें, तें करणें आलें
पुरुष-भूमिका स्वतः घेऊनी गाडा रेटतसें
तेंहि जमेना, तदा राहिला स्वस्थ, न व्हावें उगा हंसें

चित्रभूमिवर जिवंतपण ना मनीं हौस नाहीं
' धर्मात्मा ' तो विटून गेला यंत्रापुढतीही
मोजकेंच तें गाणें कैसे, चहुकडे बंधने
करार मोडुनि, स्वतंत्र होई राही स्वस्थ मनें

शरीर देइ न साथ तरिही गळा कुठें जाई?
रसिका द्याया मोद मधुरशी तो गाणीं गाई
पुढें पुढें तर आवाजाला खर येऊं लागली
रसिकां देऊं काय? आंसवे नयनी हो आली

‘ गळ्याविना गंधर्व ’ कसा मी ? नकोच हें जीवन
विकलांगानें मनी तडफडे ‘ तो ’ नट नारायण ’
‘ राजहंस ’ जणू कर्दमिं रूतला खाईना चारा
कंठांतचि कां ताना रूसल्या ? दुःख येतसे घरा
‘ परी खंत ना खेद मनाला, शांत सदा अंतरीं
कला दावुनी जीवनभर तो विकल होइ शरिरीं
‘ नर करणी जो करे होतसे नारायण ’ म्हणती
स्वयंभु ‘ नारायण ’ तो होता, तरि करि अमरकृती
महाराष्ट्र हो वेडा त्याची पूजा करि सर्वदा
कला खाणितिल होता सुंदर तो रुपया बंदा

# मुकलो आवाज ' देवाचा '

(पादाकुलक)

नाट्यगायन-नैपुण्य दावुनी
रसिकमनांना तृप्त करोनी
देहानें तो जेव्हां थकला
' भजनानें ' मग ' प्रभु ' आळविला

गात भावना नच शब्दावलि
पवित्रता ये शुभ भंवताली
भक्तिरसांत स्वर भिजलेले
पंढरपुरिचें दैवत हलले

साथीला घे टाळमृदुंगा
साद घालितो पांडुरंगा
धन्य संत ते अभंग ज्यांचे
मनीं-मुखिं उभे गंधर्वांचे

विद्वानांच्या शत व्याख्यानीं
गूढ तत्त्व नाकळे जें कुणा
तेंच स्वरांच्या माध्यमांतुनी
चटकन सहजी भिडे जनमनां

' तुमबिन मेरी कोन खबर ले '
शब्द करुण ते मीरा बोले
आर्त साद प्रभुला घालुनिया
' धांवत येइ सख्या यदुराया '

अलोट श्रद्धा भक्तिभावना
श्रोत्यांच्या भिजवितसे नयना

'अपार महिमा प्रभुचा' गाता
आळवितो तो पंढरिनाथा
जधी 'मंडळी' मुंबापुरीला
'नाना शंकरशेट'—राउळा
रंगुनि जाई भजनानंदीं
रसिका लाभे सुवर्णसंधी
विनामूल्य ते ऐकति गायन
अमोल होते अभंग-जीवन

(छंद जीवनलहरी)

'वातावरणांत पवित्र मंगल'
सारा नटगण हाती घेई टाळ
भक्तिभावासह खुलला यमन
रागविस्तारांत संगीत भजन
साथीला मृदुंग, टाळ एकतारी
गाणारे नटही गाती बरोबरी
'अवघाचि संसार' एक तत्त्व नाम'
एका पाठोपाठ गाती ना विश्राम

(मिश्रवृत्त)

'संतचि भलते याति असो'— हा अभंग सुंदरसा
'काया गडका मैं वासी'— तो 'बांका' संताचा
'माऽई मैने गोविंद लीनो मोल' मीरेचा
'जोहार मायबाप् जोहार' हा तो फार आवडीचा
'वैकुंठीच्या राया' हा तो कान्होपात्रेनें रचिला
'ज्ञानोबा माउली, तुकाराम'— गजर तेथ चालला

(पादाकुलक)

नाट्याभिनया वाव न तेथें
भगवंताशीं जडलें नातें

अतीव श्रद्धा मनीं उमाळा
मुक्तपणें गातसे आगळा

कानावरती हात ठेवुनी
तल्लीनतेनें गात रंगुनी
हरेक गुरुवारीं रात्रीला
आठ वाजतां सूर लागला

अपूर्व तेथें दिसे सोहळा
अगणित रसिकहि होती गोळा
दाटीवाटीनें बसलेले
कुणा कशाचें भान न उरलें

सुस्वर भक्तिरसानें न्हाला
भजनानंदीं ताल नाचला
निनादुनी जातसें शिवालय
एकवटुनिया जाती स्वर–लय

'दिसें स्वरूप तें किती मनोहर
भुलला त्यावर भोळा शंकर
शिवालयीं त्या अजुनि वाटतें
ओले स्वर ते असती तेथें

आठव होता मनीं दाटतें
नीररूप घेउनि ओघळतें

(छंद जीवनलहरी)

स्वरांचा गोडवा शब्दांना येतसे
अभंग काव्य तें स्वरांस साजेसें
तालवाद्यांना ये साहजिक भर
दुःख वेदनांचा पाडिती विसर
कधी गेला वेळ जाणवे न कोणा
तल्लीन जाहले श्रोते, त्या भान ना

अचानक पडे मुखांत प्रसाद
तेव्हां कळतसे थांबला तो नाद
कानीं परी राही भरूनीया स्वर
वातावरणांत भैरवीचे सूर

(छंद देवीवर)

'पाहे प्रसादाची वाट' अखेरीचा अभंग तो
भैरवीच्या मधु-आर्त स्वरीं भाविक नाहतो
सारे ऐकुनिया वाटे पूर्ण भक्तीची भावना
भगवंत येईल ही 'शरण या नारायणा'
स्वर्गीं भगवंताचें कां जरा हलेल आसन
'नारायणा' भेटाया ये शेषशाई नारायण
डोळे भरून पहाया भक्ता-अचक्षूसी डोळे
करावया भक्त-पूजा घेई करांत कमळें
वेड्या मनीं उगा येई दिसेल कां ही किमया?
'याचि देहीं याचि डोळा' मिळेल कां पहावया?

## न्म दिलें माता परी पाळिलें तुम्ही तें

जन्म दिधला माउलीने, पोषिले परि हो तुम्ही
'अन्नदाते', 'मायबापा', चरण तुमचे मी नमी
प्रेक्षकांना देव मानी (भक्त झाले ते परी)!
रंजवी नित गायनीं त्यां, ना कसूर कधीं करी

लाड पुरवी प्रेक्षकांचे, विनतिचा बहुमान ठेवी
रसिक सेवा नित्य करितो काय वानूं थोरवी!
प्रेम, निष्ठा त्यांवरी देण्या, समाधाना झटे
खेळ ना कधि स्थगित झाला—कितिहि आली संकटे

अत्तराचा गंध उंची दरवळे प्रेक्षागृहीं
(प्रेक्षका उल्हास द्याया) परतती मोदें गृहीं
लावुनी चटका मनांना बांधुनी स्वरबन्धनीं
अभिनयाच्या विविध रंगी प्रेक्षकां दे मेजवानी

चैन देऊनि तो करी बेचैन त्यांचीं अंतरें
तृप्ति-अतृप्ती सवेही नकळतां मन हुरहुरे
रागगायनिं घ्यावया आस्वाद त्यांना शिकविलें
उंचवोनी अभिरुचीला, रसिकतेला वाहिलें
स्वर्गिंची गंधर्वनगरी भूवरीं त्यां दाविली
वेदनेतिल तीव्रता विसरावयाही लाविली
जीवनांतिल नाट्य अवघें नाट्यजीवनिं रंगलें
जनमनें वेडावलीं, अस्तित्व सरलें, भान हरलें

रात्रिला नांदी सुरू हो, हो पहांटे भैरवी
ताण पडला जरि गळ्याला, प्रेक्षकांना गुंगवी
'गां पुन्हां हो, गा पुन्हां—' प्रेक्षागृहीं टाळी पडे
तो न अव्हेरी कधीही विनति त्यांची, ना चिडे

(शार्दूलविक्रीडित)

" पैसे घ्या कितिही ' स्वयंवर ' परी दावाच आम्हा उद्यां '
येती प्रेक्षक शेंकडो म्हणत " त्या डोळेभरी पाहुं द्या "
गांवोगांव अशी स्थिती जन असे वेड्यापरी धावती
जैसे गोकुळिं गोप गोपि मुरली–नादांत नादावती

(पादाकुलक)

रसिक–हृदय जणुं त्या सिंहासन
राजा चालवि राज्य आपुलें
' राजा गाई जनता हाले '
उपास्य दैवत, त्यांचे झालें
कौतुकाश्रुंनी करिती सिंचन !

जीव टाकिती ओवाळुनिया
अपार करिती प्रेम तयावर
देवाहुनिंही थोरचि हा नर
म्हणती सारे, अतर्क्य हें तर
पाहुन, ऐकुन त्याची किमया !

घेण्याहुनिही अधिक देणें
–मर्म जीवनी त्यास ठाउकी
निंदा किंवा कटु कुटाळकी
करोत कुणीही उपहासा कीं
कलायज्ञ मांडिला तयानें !

## ती किती सांगू — —

(भुजंगप्रयात)

नटांनों नव्या गायकांनों, मुलांनों
पिढीच्या नव्या ह्या अभागी मुलींनों
तुम्ही पाहिलें, ऐकिलें ना तयाला
जयानें दिला मोद गेल्या पिढीला
सदा वाद्यवृन्दांत कल्लोळ जेथें
अशी ऐकता ना तुम्ही चित्र-गीतें ?
रुचेना कधीही, पटेना तुम्हांते
परी ऐकुनी घ्या जरा शांतचित्तें
जणूं स्वर्गिची शापिता देवबाला
असा ' बालगंधर्व ' होऊनि गेला
करी ना कधी नाट्य-गानी कसूर
लयीच्या सवें खेळतो सूरसूर
कलाक्षेत्रिं या मानदण्डास माना
तयासारिखा तोचि होणे पुन्हां ना
जणूं अन्नदाता समोरील श्रोता
करी नित्य सेवा, मनीं ना अहंता

( सूर्यकांत )

कसें तयाचें रंगरूप अन् कशी केशभूषा
जाणुनि घ्या हो त्याची होती कशी वेषभूषा
गोंडस गोरे हात जनानी, धवल अंगकांती
शरीरसौष्ठव बहारिचें तें, जणूं रतिची मूर्ती.
गोल गोल चेहरा, वदन तें दिसे स्निग्ध शांत
सात्त्विक भावांचे वर खेळे तेज मूर्तिमंत

राजसवाणें रूप देखणें जणुं मोहक लेणें
‘ दिपले पाहुनि नरेश ’ ऐसे माना वेळावणें
स्त्री जातीचे सद्‌गुण सारे लाज, विनय भूषणें
आविर्भावा लकब बायकी, लाडिक तें बोलणें
टपोर डोळे विलोल दिसतो त्यांत पूर्ण भाव
मनरंजन हो पाहूनि अवघे रम्य हावभाव
‘ नारायण ’ रूपांत अवतरे रंगदेवता ती
‘ अवयव सगळे नयनीं जमती ’ पहावया मूर्ती.

( शार्दूलविक्रीडित )

भासे स्त्रीच उभी समोर बघता सौंदर्य अन् सौष्ठव
अंबाडा भरदार, पुष्पगजरा त्या भोंवती तो नव
शालू नेसुनि बुट्टिदार जरिचा होऊन सालंकृत
श्रोते प्रेक्षक गौरवास करिती होऊन रोमांचित

(छंद देवीवर)

काय वेषभूषा असे | सारा थाटच आगळा
लफ्फेदाज शालूवरी | शोभे मोतियांची माळा
अळित्यांनें रंगलेले | लाल हाताचे तळवे
डाव्या खांद्यावरुनीच | जरिकांठ खाली धांवे
माना वेळावणे तेंही | किति लाडिक जनानी
शब्द, वाक्य पक्के मनीं, | स्वच्छ शुद्ध, स्पष्ट वाणी
स्वच्छ ‘ पॅरिस ’ रूमाल | एका हातातून दूजा
खेळवीत पुन्हा पुन्हां | वाटे त्याच्यांतही मजा
सभ्य पोषाखांत दिसे | खानदानी घरांतील
शालू चापून चोपून | नेसलेला पायघोळ
दर प्रवेशा गणिक | तऱ्हेतऱ्हेचे सणंग
गर्भ रेशमी पोताचे | त्याचे झाकिताती अंग
दर नव्या नाटकाच्या | नव्या कोऱ्या प्रयोगाला
खास काढवून घेई | उंची जरीच्या मालाला

उंची अत्तरांचा षोक नित्य करीत खरेदी
अंगांगावर लाविता नाट्यगृह हो सुगंधी
रंग-रस-सुगंधाचें नादब्रह्म हो साकार
प्रेक्षकांना मोद द्याया झटे तनुमनें फार
नटाठायीं प्रकर्षानें असावेत कांहीं गुण
तेच ' नारायण-अंगीं ' आले सारेच दिसून
स्वाभाविकपणा, तैशी सहजता, कल्पकता
रंग-रस ज्ञान तैसें कौशल्य नि चपलता
स्वर-तालांचीच जाण, भूमिकेचा स्थायीभाव
नाहीं कंटाळा कधींच तसा नाहीं मनीं गर्व
निरलस वृत्ति अंगीं कर्तव्याची निष्ठा मनीं
साऱ्या गुणांमुळें तो या ' नटसम्राट ' जीवनीं
शृंगारीक भूमिका त्या होती बहारीच्या फार
तैसा करुणरसाचा अतुलनीय प्रकार
शृंगारांत शांत सौम्य भाव सात्विक दिसला
नाहीं अश्लील, बीभत्स थारा थिल्लरपणाला
स्वतः भाविक वृत्तीचा भक्तिरसा रंग देई
जेव्हां कान्होपात्रा, मीरा सावित्री, द्रौपदी होई
भूप, बिहाग, बागेश्री, भीमपलास, जोगिया
कालिंगडा, भैरवी हे राग आवडीचे त्याच्या
गाता तिलककामोद, पिलु, काफी, नि जंगला
पहाडीत मोहकता सदा सर्वदा रंगला
राग-रसांची एकता योग्य मिलाफ आमोद
' मम सुखाची ठेव ' ही गाई तिलककामोद
चाल गंभीर तयाची ठाय लयींत गातसे
गद्य-संगीता पोषक सारे कसे शोभतसे
जसें संगीत मोहक तसे गद्य हळुवार
लोण्यामाजी विरघळे जणुं सहज साखर
' बाल गंधर्वा ' चे गाणें सोपें तरी अवघड
उंच उंच वेलावरी जणुं द्राक्षांचेच घड

अनुकरणा कठीण थोरामोठ्या गायकांना
हाच महान् विशेष काय कसा आकळेना
फिरे आवाज हलका तान स्वच्छ दाणेदार
स्त्रीच्या आवाजाहूनही त्याला गोड गोड झार
पुनरुक्तीचा तयाच्या कधी कंटाळा ना येई
त्याच्या पुण्याईचा सांठा श्रोते गय करीतीही
वाक्यें पुन्हां पुन्हां म्हणें– द्याया संदर्भ मागील
परिणाम योग्य व्हाया पटवून तो देईल
तशा पदांच्याही ओळी घोळ घोळून म्हणे तो
'नाहीं बोलत मी नाथा' तऱ्हेतऱ्हेने सांगतो
मंचावरती एकटा जेव्हां असे तेव्हां गाई
अतिविस्तारानें पदें खूष प्रेक्षकही होई

( शा. वि. )

होता गोड निसर्गदत्त सनई जैसा गळा आगळा
सारंगीस्वरिं एकरूप बनता नाहीं तयाला तुला
दे आल्हाद मना सुरेल अवघे साधे सुधे गायन
कैसे घेतिल जाणते रसिकही मोदे रसास्वाद न ?
खाँ, मिय्याँ निज कर्णपाळि धरुनी नांवाजती त्या प्रती
"मीठी है लगती निषाद' म्हणती मोठे गवय्ये किती
"मेरेसे लगती नहीं बरस मैं चालीस गाता रहा"
ऐसे बोलुनि ते हळूंच पुसती नेत्रांस कैसे ! अहा !
घेई तो समजून अर्थ, रसही गाण्यांतली कल्पना
रागाचे स्वर, ताल, तोल लयही सांभाळुनी भावना

(पादाकुलक )

जवारि जैसी स्वरा माधुरी
गात असे नुसत्या कंठानें
गात असे परि तो नयनानें
ओठानें तैसे हृदयानें
सर्वांगानें गात खरोखरी !

करांत-कर स्वर करिती रिंगण
मंत्र घालुनीं ते जादूचे
भारूनि टाकिती जीव जनांचें
स्पर्श जयांचे मोर पिसांचे
हरखुन जाती श्रोते हरवुन !
नाट्य-गान निपुणता अलौकिक
आवाजाला झार विलक्षण
लयकारीचे त्यास सहजपण
नाट्य संगिता नव आकर्षण
' मी मी ' म्हणणारे नतमस्तक !
गान-क्षेत्रिंचे ' विराट ज्ञानी '
शास्त्र-नियम जे बहू मानिती
नियम भंग ते साहुनि घेती
' दाद ' देऊनी ' वाहवा ' म्हणती
कला ऐकुनी ही ' नारायणि ' !
हरकति, मुरकी, खटके, ताना
गळ्यांतुनी झरझरा वाहती
नवनवीन घे सु-स्वरसंहति
स्वरसिद्धीची येत प्रचीती
' अति आनंद ' चि फुलवि मनाला !
तालस्वरांचे घेऊनि धागे
गोफ विणितसे अति हृदयंगम
रंग-रूप-नादाचा संगम
गवयांनाही नकळे ' सरगम '
गायनी नित तो असाच रंगे !
कधि न स्वरांशी करि धिंगाणा
आवाजाची फिरे भिंगरी
घासुनि जाई सारंगी स्वरीं
केवळ त्याची खास माधुरी
गमकेच्या ना घेई ताना !

स्वरांतली आर्तता आर्जवी
हळुवार करी स्पर्श मनाला
सूर सूर आपुल्या जागेला
गोड जनानी गळा आगळा
स्वर-शेखर तें रूप लाघवी !
उस्तादांचें अवघड गाणें
जाति-खुमासम करूनि मुलायम
स्वर-लयिंचा मनहारी संगम
अमृत-कारंजें कीं अनुपम
देवाजीचें उपजत देणें !
आम्रफलांतिल अवीट गोडी
घेउनि गाई अमृत-गाणीं
' कंठमधु-बळें ' टाकी मोहुनि
शब्द पदांचे रसांत भिजवुनि
रसिक-मनें तो करितो वेडीं !
स्वर-विलास ना तुटक जाहला
सारंगीच्या तंत-स्वराला
तंतोतंतचि सु-स्वर भिनला
' पुष्पपराग सुगंधित ' झाला
मधुर मधाचा दे निर्वाळा !
पदात उतरे अमित गोडवा
जी लय घेणें पुढिल पदाला
गद्य भाषणें त्याच लयीला
घेउनि नकळत येइ स्वराला
रसिकां दे सौख्याचा ठेवा !
द्वादश-स्वर-राशींचा स्वामी
सूर्य न कां हा स्वर-नारायण
अंकित त्याच्या अवघे स्वर-कण
मोद द्यावया बांधी कंकण
स्वर-वसनाचा पोत रेशमी !

( छंद देवीवर )

'काफी' रागा चव येई कोजागिरीच्या दिनाची
–गोड केशरी दुधाची ज्यांत सुवास वेलची
'मांड' रागाची मांडणी 'मानस' कां बधिरावे?
अजूनही आठवीता घेते मन हेलकावे
तीव्र दुःखानें हो आज 'तीव्र निषाद' ही खिन्न
वर्ज स्वर घेउनीही 'भीमपलासी' प्रसन्न
'धांवत रे येई सख्या' साद घालावीशी वाटे
'पहाडी'ची सुरावट रसिकांच्या मनीं सांठे
'भैरवी'चे कानीं सूर येता वाटे 'संपले हें'
मना वाईट वाटलें परि कान तृप्त राहे

(शा. वि)

कंठाला लडिवाळ जी लटक ती त्याला सदा शोभते
बाला घालुनि कर्णफूल फिरता जैं हालतें, डोलतें
जैसे लावुनि गालबोट सजतें सौंदर्य निःसंशय
तैसा शास्त्र-प्रमाद, गात असता, त्याना कुणाचें भय
देऊनी हलकेच कोमल निषादा हेलकावे तदा
जाई षड्जस्वरी कसा नकळता, वर्णूं कशी संपदा?
टाळ्या वाजवुनी सहर्ष म्हणती 'गा तें पुन्हां एकदां'
ऐसा 'भीमपलास' रंगत तिथें मंचावरी सर्वदा.
श्रोत्यांच्या मनरंजनार्थ पद तें गाई पुन्हां तेवढें
जाई गाउनि आंत, ये पुनरपी आंतून जेव्हां पुढें
येतांना लय वाढवून सहजी खेळे स्वरांशी मुदें
वारंवार असें घडें, अनलसें तो आळवी तीं पदें

# ' या नव नवल नयनोत्सवा '

( छंद देवीवर )

नव्या कोऱ्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला
करी माउलीची पूजा असा नट नाहीं झाला
प्रेक्षागृहाच्या दाराशीं खांब केळीचे हांसत
येणाऱ्यांचें करितात मोठ्या मनें ' सुस्वागत '
आंत जातां जाणवला मस्त धूपाचा सुवास
मखमलीचा पडदा रंगमंचाची आरास
साथीदार बैसलेले रंगमंचाच्या समोर
वाजविण्या सज्ज होती हृदयांत हुरहुर
ऑर्गनचा भरदार सूर वातावरणांत
तबल्याची ठाकठोक तीही चालते लयीत
प्रेक्षागृह भरलेलें स्त्रिया-पुरुषांची दाटी
मुसल्मान, पारशीही तसे भाटिया, मराठी
रंगीबेरंगी साड्यांची कानीं येई सळसळ
मनगटी पाहतात पुन्हां प्रेक्षक घडयाळ
" झाल्या ना हो दोन घंटा ?" आतां होणार तिसरी
एकमेका पुसताना आले प्राण कर्णीं-नेत्रीं
सुरूं होण्याचीं लक्षणें जशी दिसाया लागली
उत्कंठेनें प्रेक्षकांची कानशीलेंही तापली
हार-घातला पडदा मऊ रेशीम-चुण्यांचा
" किती वेळ उभा राहूं ? " म्हणे, जरी नसे वाचा
गेले दिवे, पंखे सुरूं हालें वाऱ्यानें पडदा
प्रेक्षागृह न शीतल– ( नवयुगाची संपदा ! )
मखमली लव मिटे होता इशारा तिसरा
रंग-रूप नाद ब्रह्म विनटलें साक्षात्कारा
चार वाजतांचा खेळ सुरूं पांचाच्या सुमारा
नाहीं फिकीर, निषेध, व्यवस्थापकास ' घेरा '

व्यवस्थापका ‘ घेराव ’ खास तिकिटांसाठींच
होता सुरू नाटक तें नाहीं भान घड्याळाचं

मधोमध सूत्रधार परिपार्श्वकांची जोडी
लाल पगडी मस्तकीं कमरेला शालजोडी
हात जोडोनी, सुमना वाही रंगदेवतेला
आणि नाटककाराच्या, गुरूच्याही प्रतिमेला

‘ नमन ’ तें ‘ नटवरा ’ करी ‘ विस्मयकारा ’ तो
‘ नांदी ’ माजी नाटकाचें कथा—बीजचि सांगतो
पडद्याच्या आड नांदी असा नव्हता जमाना
गाणीं म्हणणाऱ्या ‘ फीती ’—त्याची नव्हती कल्पना

सारे सजीव, घोटीव दर वेळीं पुन्हां पुन्हां
पार्श्व—वाद्य—वृन्द मेळ रस दावाया कधी ना.
‘ सुई—पडली ’—शांतता दुजा आवाज ना कानीं
सारंगीच्या गजा सह हाले गोंडा तो इमानी

पौराणिक कथानक संगीताची बरसात
तेव्हां ‘ भरत-वाक्या ’ला उजाडतसे पहांट
भरपूर प्रवेशांचें पांच-सात अंकांचेंही
चालें नाटक रंगत रात्री दोन वाजतांही

जराही ना कंटाळती प्रेक्षकांना न जांभई
एकटक पाहताती डोळ्या पुढील नवाई
दोन अंकांमधली ती नको विश्रांती आम्हांला
असा प्रवाह चालूं द्या ( काय किंमत चहाला ! )

रंगमंचाची नायिका —नट—नायक तो खरा
‘ बालगंधर्वा ’ पहाया त्याचा सात्त्विक नखरा
नाही भलतेंसलतें दिसणार मंचावरी
घेऊनीया सुत-दारां श्रोते येती; श्रद्धा पुरी

दोन-अंकांमधील तो कधि संपणार काळ
साऱ्या प्रेक्षकांचा राग —दिसे मखमल लाल.

'ज्ञानी' 'विराट' 'मत्सर' असे कडक, कठीण
शब्द होती मुलामय सुस्वरांत त्या भिजून
गाभा पदांच्या अर्थाचा गोड सुरांत-तालांत
नृत्य-संगीत मिलाफ अक्षरा नि अक्षरांत !
जणुं कथ्थकाचे बोल कुणीं हळूं टाकावेत
खास भासती पदांत 'नयने ऽ लाजवीत'
टांचा उंचावून वरी गाता गाता मागें जाई
व्हावें कोरीव लेणें तें त्याच वेळीं मनीं येई
श्वास-निश्वास-स्वरचि गाणें 'गंधर्वा'चें होई
वाट स्वरांची पाहत 'काल' उगा उभा राही
करी प्रतीक्षा तरुणी प्रियकराच्या भेटीची
तशी 'सम' उभी राही जणुं 'बालगंधर्वा'ची
मंत्रमुग्ध करीतसे जणुं कोणी पंचाक्षरी
–बा–ल–गं–ध–र्व–अक्षरें पांच शुभ नाट्यक्षेत्रीं
फार जाणीवेनें गाई कुठें यतिभंग नाहीं
शब्दापाठोपाठ अर्थ आपोआप उभा राही
'बालगंधर्व'–विषय रसिकांत ना दुमत
'नटसम्राट' एकच एकमुखें म्हणतात
अमर्याद हा विषय किती सांगावा, बोलावा ?
नित्यपाठांत स्मरावा थक्क करितो मानवा

कां हो 'ताजमहाल' तो मनोहर ?–त्या दिव्यत्व ?
मूलभूत तत्त्वें त्यांत त्यांचें पूर्णत्व, शुचित्व
तसा 'नारायण' भासे सर्व सद्‌गुणें मंडित
राही निःस्वार्थबुद्धीनें सौजन्याला नाहीं अंत
'स्वगतां'चा रम्य थाट जणुं हितगुज करी
त्याच्या नंतरच्या पदां फार येतसे खुमारी
'नारायणा'चा स्त्री-वेष पुरुषांना वेड लावी
त्याहूनही महिलांना वाटे अपूर्व थोरवी

त्याचें बोलणें, चालणें नटणें नि मुरडणें
वाटे स्त्रियांना आदर्श— असा नट नाहीं होणें
सुस्वरांची वेलबुट्टी पदांच्याच पालुपदा
वातावरण तयानें निर्मितसें तो सर्वदा
फुलबाजांतील फुलें तेजस्वी नि आकर्षक
पदांतील कांहीं ‘ जागा ’ स्वर शब्दांना पोषक
दृष्ट लागण्यासारखें रम्य, गोंडस गायन
सारा भाव गाण्यांतील एका ओळींत–दर्शन
शब्दांशब्दांतील भाव घेई पकड श्रोत्यांची
अशी गायनाची रीत होती ‘ बालगंधर्वा ’ची

# पुष्पसंभारां

(छंद : देवीवर)

‘ बालगंधर्व ’ पदवी      सानपणीच लाभली
सार्थ करूनीया त्यानें      यथाशक्ती दावियेली
कौतुकाचें प्रोत्साहन      जीवनास सजीवन
कष्ट करूनिया त्यानें      नांव मिळविलें छान
शतसांवत्सरिक जो      नाट्यमहोत्सव झाला
दिलें अध्यक्षपद त्या      नटसम्राट लाभला
‘ राष्ट्रपती–पदक ’ तें      पदी आलें आपोआप
‘ कला ललित ’ तयाची      तिचा वाढलासे व्याप
सरकारी ‘ मानधन ’      सेवा पाहुनीया दिलें
मनीं नाहीं कधीं खेद      नाहीं हर्षाचे उमाळे
इतुके हे मानपान      अनिवार स्तुतिपाठ
रसिकांची सेवा करी      भरे पेला कांठोकांठ

(भूपति)

आधींच प्रभूनें गौरव त्याचा केला
धाडिला घालुनी कंठी मधुर रसाला
सौंदर्य, कला, लय, कांती देउनि त्याला
आम्ही तो पामर !–गौरव कसला केला !
शब्दांत, धनानें मोल, तोल कां होई
देवाचा प्रेषित अमाप ती पुण्याई !

(चामराख्य)

नाट्यजीवनांत अर्धशतक वेचिलें असें
तया परीस तोचि तो, दुजा जगीं कुणी नसे

रंगभूमिचा सदैव एकनिष्ठ सेवक
रूप-गान जीवनास रंग दे कलात्मक
दीर्घ कष्ट घेउनीच वैभवास ने कला
योगिराज तो खराच साधनेंत गुंगला
आचरी तपा जणूं, अजोड व्यक्ति ती भली
शास्त्रशुद्ध गायनास सहजता तयें दिली
गौरवार्थ देउनी तयास ' पद्मभूषण '
गौरवीत आपुल्यास त्यासवेंचि ' शासन '

( पादाकुलक )

परोपरीनें करिती गौरव !
पाउणशें वयमान जाहलें
वार्धक्याची जवळि पाऊलें
मनीं जिद्द, जरि तनचि पांगळें
घडवुनि आणिति अमृत-उत्सव !
स्तुति-सुमनांचे करुनी झेले !
वाहुनि त्याच्या पदकमलावर
रसिक म्हणाले ' धन्य ! धन्य नर ! '
नव्हता ठायीं भाव आपपर
भक्त तयाचे कितीक झाले !
करुनि कलेची समाराधना
जनमन-सिंहासनीं बैसला
रंगभूमि-इतिहास घडविला
रसिकांचा तो देव जाहला
' देवा ' ' देवा ' म्हणता त्यांना !
अलौकिक असा कलाकार तो !
व्यवहारी कोष्टकें, प्रमाणें
हिशेब, गणितें, मूल्यमापनें
व्यर्थ, जरि कुणी ' करितोच ' म्हणे
अ-गणित त्याची कला-असा तो !

‘ स्वर्लोकीचा हा गुंजारव–
—असुनी, मग भूवरी कोठला ? ’
—वाचुनि ऐशा वर्णनाला
‘ शापसंभ्रमा ’ माजि पाहिला
हुबेहूब हा त्याचा गौरव !
उतार आयुष्याचें वर्णन
उत्सन्न अशा अवशेषासम
साम्राज्याच्या जुन्या भव्यतम
कलाकुसरिचे मनोज्ञ संगम
अशा स्थितींत वसे ‘ नारायण ’ !

## र मायबाप जोहार

(हरिभगिनी)

महाराष्ट्राची संस्कृति-गाथा, अभंग रचिला त्यांत जसा
'नारायण' रूपांत असा
काळहि झाला तन्मय, वदला, "स्वर-पुष्पा कर लावुं कसा?"!
पहात राही दुरून त्याला—कंठमणी जो रसिकाचा
मूक जयाची हो वाचा
'प्राण हरण करूं कसा? वदे मनि, विसर पडे कर्तव्याचा!
रेंगाळुनि राहिला तो जरा, भान न राही नेण्याचे
ऐकता शब्द तिथे स्तुतिचे
भंजन करूं न शकला क्षणभर कलास्फूर्तिच्या मूर्तीचे!
दिवस कितीतरी जाऊं दिले, मग भानावर येई काळ
पाश घातला तात्काळ
बांधुनि प्राणां, घेउनि गेला, सोडविले तन व्याकूळ!
अनंतांत हो विलीन आत्मा, भरतवाक्य झालें भासें
जीवन-नाट्याचें ऐसें
पडदा पडला अखेरचा, अन् रंगभूमिही आंसु पुसे!
वाटे 'अनृतचि मृत्यु आला' 'राजहंस' कैसा निजला
नकोच वार्ता कानाला
रंगभूमि-उत्कर्ष-बिन्दु तो नीर आणितो नयनाला!
'हृदयी लागे हुरहुर' ऐशी मीन मानसीं तळमळला
आठवणी होती गोळा
श्रवणीं, नयनीं, मनोमनीं, तों भरजरि स्वर-पट उलगडला
तेल संपले, ज्योत फडफडे, प्रकाश मन्दावुनि गेला
तम येई अनुभूतिला
शेवटचा तो स्नेहबिन्दु अन् जीवनरसही ओसरला!

(दिंडी)

गळा जाउनि राहिला सूर मागे
सत्य विरलें तरि येथ स्वप्न-धागे
जीवनाचें जरि पुष्प गळुनि गेले
स्मृति-सुगंधानें मन सजीव झाले

(पादाकुलक)

चिरंतन असे स्मारक होई
गंधर्वांचे, नाट्यकलेचे
'रंगमंदिर' या नावाने
जनतेच्या तें कृतज्ञतेचें
प्रतीक हृदयंगम-दे ग्वाही !
स्वप्राणांची शिंपण करुनी
रंगभूमिच्या उद्धारास्तव
'नट' –संस्थेचा करण्या गौरव
देण्या त्यास प्रतिष्ठा वैभव
श्रमला सारे जीवन वेंचुनी !
जणूं भासतो नाट्यभगीरथ
आत्मयज्ञ मांडुनि करितोही
कलाविलासातून प्रवाही
आनंदाची भागीरथीही
रंगभूमिवर धारा बरसत !

(मिश्रवृत्त)

रंगभूमिवर रंगांना दे हिऱ्यामाणकाचे मोल
कलावंत–अभिनयास देई वज्राचेही जणू बळ
हृदयस्थ स्वरां चढवी पाणी मोत्याचे तो तेजस्वी
असा एकला जादुगार तो गेला सोडुनिया पृथ्वी
महाराष्ट्र चुकचुकला अंतरीं, साहजीक नयना पाणी
उरलीं आतां ध्वनीमुद्रित तीं ऐकायाला मधु-गाणी

(छंद जीवनलहरी)

जगा आनंद दे	धन्य त्यांची कला
सत्यजीवनांत	परी दुःखी झाला
कर्जाचे डोंगर	अनेक आपत्ति
भोगाव्या लागल्या	देवाची ही रीती
'गंधर्वता' फेडी	सारे कर्ज जुनें
'बालवृत्ती' त्याची	'जोडूं पुन्हां' म्हणे
जिद्द, हट्ट फार	एकेका गोष्टीचा
म्हणे 'जे हवे तें	हवेच' समजा

# ‘ही असेल तव कुटिल चतुराई’

(चामराख्य)

प्रभो, सुरेख देणगी दिलीस—घेतलीस तूं
सुवर्णशिल्प भंगुनीही साधिलेस काय तूं?
परी न भंगणार तें सुवर्ण, होई अमृत
स्मृतींत आमुच्या अमोल अमर राहि संतत

जरा दिलीस कां तशी अलौकिकास दुःखदा?
कां दिली न—चिरयुवा करून—शरिरसंपदा?
‘ कुटिल कारिसि चातुरी ’—विदित होई रे अम्हां !
विनति करिसि मान्य कां, प्रभो दयाळु, उत्तमा?

वाटते मना प्रभो—‘ तयास जन्म दे पुन्हां ’
पुन्हां मनांत येतसे—‘ नको अशक्य कल्पना ’
जमेच ना तुला पुन्हां तशीच तीच आकृती
युगायुगांत एकदांच घडविशी अशी कृति

सारखेपणा जगीं कुणातही न आढळे
हरेक व्यक्ति वेगळीच, व्यक्तिमत्व वेगळे
म्हणून ये महत्त्व त्या जगांत अद्वितीय तो
कला अशी अपूर्व रे प्रभो तुझीच, जाणतो

तें स्वरूप, तो गळा सुरेल, ती कला पुन्हां
तसाच षोक, ऐट ती, तसा स्वभाव, भावना
तशीच अंगकांतिही, तसे शरीर सौष्टव
तशीच रम्य माधुरी, तसेंच गोड आर्जव

तसेच साथिदारही, तसें समर्थ सद्‌गुरु
तयाविना करील काय तें नवीन लेकरूं?

पुन्हां तसेंच दुःख त्या, अखेर तीव्र वेदना
नको नको, तया परीस जन्म त्या नको पुन्हां !

पुन्हां इथें असेल यायचा–स्वयंभु त्या करी
नकोत कष्ट वेदना; चमत्कृति अशी करी
पंधरा वयांतला–असाच निपजवी तया
पूर्वजान्मिची असो तयास जाण, ही दया !

पुन्हां बघूं सुखे सदा अजोड त्याच अभिनया
तोच मधुर स्वर, पदें पडोत नित्य कानिं या
नव्या पिढीस पाहुं दे, तयांस स्फूर्ति घेउं दे
तयापुढील आणखी पिढीस मोद होउं दे

वेड हें जरी कुणी म्हणेल आमुचें तरी
विभूतिपूजनींच ओढ लागते अशी खरी
शरिरधारि जो असे तयास मरण प्रकृती
नियम हा तुझा जगीं असे जनांस माहिती

म्हणून मानितो तुला, तयास स्वर्गिं सौख्य दे
नकोच पाठवूं पुन्हां, तिथेंच त्यास राहुं दे

(छंद : देवीवर)

आहे दिव्यत्व, भव्यत्व तुझ्याजवळीं रे देवा
परी रसिकता कोठें? कसें चैन तेथें जीवा
कंटाळून जाईल तो तुझ्या स्वर्गीच्या वैभवा
परतुनी येईलही असा भरंवसा नवा

कलावन्तांच्या जगांत युगपुरुष तो होता
नव्या गंधर्व–युगाचा तोच होईल निर्माता
तोचि उद्गाता होईल तोचि अस्मिता होईल
जर नवा जन्म त्यास देवा, पुन्हां तूं देशील

सोनियाचा कालखंड पुन्हां काळाच्या ओघांत
परतूनी येईल कां? आस खेळते मनांत

(छंद : जीवनलहरी)

आजच्या जीवनीं         आलें रुक्षपण
न—नाट्य पोषक         अरसिकपण
सुगम-संगीत         चित्रपट-गीतें
कमी व्हावयाला         जन्म देई त्यांत
तरुण व्हावया         वर्षे लागतील
आमुच्या जाण्याचे         वेध लागतील
चुकामूक अशी         नकोच व्हावया
नको जन्म देऊं         तया देवराया
जगांत तयाला         नाहीं शत्रू कोणी
सेवेंत गुंगला         होता तो जीवनीं
मिळेल तयाला         सहज सद्गति
म्हणू फार तर         होती ' स्वप्नकृती '

(छंद : देवीवर)

म्हणे विधाता ' मेनके         तुझ्यासारखीच मूर्तीं
नाहीं घडवीणें शक्य         मला कधीही जगतीं '
' गंधर्वा 'च्या जीवनाचें         सारे सार यांत आलें
समर्पक वर्णन हें,         एका वाक्यांतच झालें

(छंद : देवीवर)

' अमृत मधुर शब्दां         स्वरां पुन्हां ऐकण्याते '
श्रवणिं सकल शक्ती         आज एकत्रचि होते !

संग्रहालय, ठाणे.
REFBK-0018301
REFBK-0018301